बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com
# बेरार टाईम्स
मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक १९ | बुधवार,दि.१९ एप्रिल २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# अजित पवारांकडे राष्ट्रवादीच्या ४० आमदारांच्या स्वाक्षऱ्या, भाजप सोबत जाणार असल्याची चर्चा

**मुंबई:** राष्ट्रवादीचे नेते आणि राज्याचे विरोधी पक्षनेते अजित पवार हे भाजपमध्ये जाणार असल्याच्या चर्चांना त्यांनी पत्रकार परिषद घेऊन अखेर पूर्णविराम दिला आहे. दोन दिवसांपासून राज्यात याबाबत चर्चा सुरू होती. या सर्व घडामोडींवर अजित पवार आज बोलते झाले

बाबांनो काळजी करू नका. शरद पवारांच्या मार्गदर्शन, नेतृत्वाखाली राष्ट्वादी काँग्रेसची स्थापना झाली. आजवर अनेक चढउतार आले. मात्र, बातम्या जाणीवपूर्वक पसरवल्या जात आहेत. महत्त्वाचे प्रश्नावरून लक्ष दुसरीकडे नेण्याचा प्रयत्न. बेकारी, अवकाळी पाऊस, महागाई, नोकर भरती होत नाही. खरेदी केंद्रे अनेक ठिकाणी बंद पडत आहेत. ही केंद्रे सुरू करण्यासाठी सरकारने पुढाकार घेतला पाहिजे.महाविकास आघाडीत आम्ही ठरवलं की, प्रत्येक पक्षाचे दोन जण बोलतील.

झालेल्या सभांमध्ये जे लोकं बोलले त्यांची बातमी नाही, आणि अजित पवार का बोलले नाहीत याची बातमी होते, हे बरोबर नाही. आमच्यात हे ठरलेलं आहे. अजित पवार राष्ट्रवादीत राहणार हे ॲफिडेव्हिटवर लिहून देऊ का? असा सवालही त्यांनी केला.

**वेळ येताच यादी राज्यपालांकडे सोपवणार**

द न्यू इंडियन एक्सप्रेस वृत्तपत्रातील बातमीत म्हटले आहे की, अजित पवरांनी स्वत: राष्ट्रवादीच्या ५३ पैकी ४० आमदारांना व्यैक्तिरित्या संपर्क साधला आहे. भाजपसोबत जाण्यासाठी या ४० आमदारांनी समंतीपत्रावर स्वाक्षऱ्याही दिल्या आहेत. वेळ येताच ही यादी राज्यपालांकडे सोपवून अजित पवार भाजपसोबत सत्ता स्थापन करतील. तसेच, अजित पवार हे मुख्यमंत्रीपदासाठी इच्छूक असून ते पद मिळणार, या अटीवरच ते भाजपसोबत जाणार आहेत.

**मोदी, शहांची हवी समंती**

बातमीत पुढे म्हटले आहे की, राज्याच्या सत्तासंघर्षाचा निकाल केव्हाही लागू शकतो. यात शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र होण्याची शक्यता अधिक आहे. असे झाल्यास सरकार कोसळण्याची भीती आहे. त्यामुळे हा निकाल येण्यापूर्वीच अजित पवारांना आपल्या गोटात



खेचण्याची भाजपची ही खेळी आहे. मात्र, अद्याप पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी याला हिरवा झेंडा दाखवलेला नाही. दोघांकडून मुख्यमंत्रीपदाचे आश्वासन मिळताच अजित पवार भाजपसोबत सत्ता स्थापन करतील.

**आमदारांमुळे शक्यतेला बळकटी**

पिंपरीचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार अण्णा बनसोडे यांनी माध्यमांना या बातमीवर प्रतिक्रिया दिली आहे. अण्णा बनसोडे म्हणाले की, अजित पवार भाजपसोबत जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. ते जो निर्णय घेतील तो आम्हाल मान्य असेल. आम्ही अजित पवारांसोबत आहोत. तसेच, सिन्नरचे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार माणिकराव कोकाटे यांनीही अजितदादा जिकडे जातील तिकडे आम्ही जाऊ, असे सूचक वक्तव्य केले आहे. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये फुटीच्या शक्यतेला आणखी बळकटी मिळाली आहे.

विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार भाजपमध्ये जाणार का?, अशी एकच चर्चा सध्या राज्याच्या राजकारणात सुरूआहे. अशात सोमवारी पुण्यातील अजित पवारांचे नियोजित कार्यक्रम रद्द झाल्याने या संशयाला पुन्हा बळकटी मिळाली. मात्र, आता अजित पवार यांनीच याबाबत खुलासा केला आहे.

**नियोजित कार्यक्रमाचा दावा फेटाळला**

अजित पवार यांनी ट्विट करत सांगितले आहे की, सोमवारी माझा कोणताही नियोजित कार्यक्रम नव्हता. मी मुंबईतच आहे. मंगळवारी १८ एप्रिलरोजी मी विधानभवनातील माझ्या कार्यालयात उपस्थित राहणार असून कार्यालयाचे नियमित कामकाज सुरु राहणार आहे.

**आमदारांची बैठक बोलावल्याच्या बातम्या खोट्या**

दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि विधानसभेचे विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी ८ एप्रिलरोजी दिल्लीत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली, असा दावा एका इंग्रजी वृत्तपत्राने केला होता. तसेच, अजित पवारांसोबत राष्ट्रवादीचे ३० ते ४० आमदारही भाजपसोबत जाणार, असा दावा या वृत्तपत्राने केला होता. त्यानंतर आज अजित पवार यांनी राष्ट्रवादीच्या आमदारांची बैठक बोलवली आहे, अशा चर्चांनाही उत आला होता. याबाबतही अजित पवारांनी खुलासा केला आहे.

अजित पवार यांनी म्हटले आहे की, मंगळवारी मी आमदारांची बैठक बोलावल्याच्या बातम्या काही माध्यमातून प्रसिद्ध होत आहेत, त्या पूर्णत: असत्य आहेत. मी आमदार अथवा पदाधिकाऱ्यांची बैठक बोलावली नाही, याची नोंद घ्यावी.पवारांच्या मनात नेमके शिजतेय तरी काय?, या चर्चांना पुन्हा उधाण आले आहे.

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर काँग्रेसचे "जवाब दो मोदी, जवाब दो" आंदोलन



**गोंदिया,**-भाजपा सरकारच्या विरोधात काँग्रेसने आज मंगळवारला येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर "जबाब दो मोदी, जबाब दो" आंदोलन केले.प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना काँग्रेस पक्षाच्यावतीने विचारण्यात आलेल्या अदानी समूहाच्या घोटाळ्याबद्दल प्रश्नांचे उत्तर मोदींनी द्यावे?,सत्यपाल मलिक यांनी पुलवामा घटनेसंदर्भात एका मुलाखतीत उपस्थितीत केलेले प्रश्न अत्यंत गंभीर व देशाच्या सुरक्षेशी संबंधित असून पुलवामा घटनेचे सत्य बाहेर यावे यासाठी राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर आंदोलनाच्या माध्यमातून जाब विचारण्याकरीता जिल्हाध्यक्ष दिलीप बनसोड,आमदार सहसराम कोरेटे यांच्या नेतृत्वात शेकडो काँग्रेसचे कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयासमोर जमले होते.

पुलवामा घटना ही सरकारची चूक आहे, असे सत्यपाल मलिकांनी सांगितल्यावर त्यांना गप्प राहण्यास का सांगितले? ,शेतकऱ्यांचे आयुष्य बर्बाद करणाऱ्या तीन काळ्या कायद्यांबद्दल आणि हे काळे कायदे वापस घेण्यासाठी आंदोलन करतांना शहीद झालेल्या ७५० पेक्षा जास्त शेतकऱ्यांच्या मृत्युला जबाबदार कोण?, पीक विम्याच्या नावाखाली अदानी-अंबानीसाठी अन्नदात्याचा बळी घेणारे व जनतेची तिजोरी लुटू देणारे कोण?,यासह अनेक प्रश्नांची उत्तरे मोदी सरकारने दिलेली नाहीत.त्याकरीता हे आंदोलन करण्यात आले.आंदोलनानंतर राष्ट्रपती यांच्या नावे निवेदन जिल्हाधिकारी मार्फत सादर करण्यात आले.सत्यपाल मलिक यांनी मोदी सरकारची झोप उडवल्याने या मुद्द्यावरून जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा भाजप सरकारने कितीही प्रयत्न केला तरी जनता त्यांच्या षडयंत्राला बळी पडणार नाही असे काँग्रेस नेत्यांनी आपल्या भाषणात विचार व्यक्त केले.

आंदोलनात प्रदेश महासचिव नामदेवराव किरसान,प्रदेश सचिव पी.जी.कटरे,अमर वराडे,जितेश राणे,निलम हलमारे,वंदना काळे,विमल कटरे,हरिष तुळसकर,आलोक मोंहती,प्रीती रामटेके,सुषमा पारधी,छबु उके,उषा शहारे, मधुसुदन दोनोडे,प्रमोद पाऊलझगडे, दामोदर नेवारे,पुष्पा खोटेले, राधेलाल पटले,डेमेंद्र रहांगडाले,एड.योगेश अग्रवाल आदी उपस्थित होते.

# १ ते ३० एप्रिल हिवताप जनजागृती महिना म्हणून साजरा

**गोंदिया:** हिवतापाविषयी जनतेमध्ये जागृती निर्माण होऊन प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या अंमलबजावणीकरीता त्यांचा सक्रीय सहभाग प्राप्त करुन घेण्याच्या दृष्टीने प्रत्येक वर्षी विविध उपक्रमांद्वारे नागरिकांपर्यंत माहिती पोहचविण्यासाठी २५ एप्रिल हा "जागतिक हिवताप' दिन म्हणून साजरा करण्यात येतो. परंतू २५ एप्रिल जागतिक हिवताप दिन एवढा एकच दिवस जनजागृती करुन न थांबता संपूर्ण महिना १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२३ हा हिवताप जनजागृती महिना म्हणून साजरा करण्याबाबत शासन स्तरावरुन निर्देशित करण्यात आले आहे.पावसाळ्यात किटकजन्य आजाराचा उदा. हिवताप, डेंग्यू, जेई, चिकुनगुनिया, हत्तीरोग इत्यादी आजाराचा डासांची मोठ्या प्रमाणात पैदास झाल्यामुळे या रोगाचा प्रसार होत असतो. बरेचदा यामध्ये मृत्यू सुध्दा होत असतात. सदर जनजागरण मोहिमेमधून हिवतापाची लक्षणे, उपचार व हिवताप प्रतिरोधाच्या विविध योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहचविणे आवश्यक आहे. किटकजन्य आजार नियंत्रणाच्या विविध उपायामुळे या आजाराच्या प्रसाराला वेळीच आळा घालण्यासाठी व समाजातील जंतुभार कमी करण्यासाठी रुग्णांनी संपूर्ण उपचार घेणे तसेच घर व परिसरात डासोत्पत्ती स्थानाची निर्मिती होऊ न देणे आवश्यक आहे.आरोग्याबाबतची कोणतीही योजना जनतेच्या सक्रीय सहभागाशिवाय यशस्वी होऊ शकत नाही. रुग्ण शोध मोहिम तसेच डासावर नियंत्रणासाठी जनतेचा सहभाग महत्वपूर्ण आहे. म्हणून जनतेनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीने किटकजन्य कार्यक्रमास सहकार्य केल्यास डासापासून प्रसार होणाऱ्या आजारावर नियंत्रण होऊन सर्व जनतेला चांगल्या आरोग्याचा लाभ होऊ शकतो.

# बदलीनंतर कार्यमुक्त न होता तळ ठोकून बसलेल्या जीएडीतील कर्मचाऱ्यांची नावे बदली यादीत

**गोंदिया-** राज्य सरकारच्या ग्रामविकास मंत्रालयाने जिल्हा परिषदेतील कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश दिले. त्यानुसार जिल्ह्यातील बदलीपात्र कर्मचाऱ्यांची तात्पुरती सेवाजेष्ठता यादी जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर लावण्यात आली असून आक्षेप नोंदवण्यासाठी २६ एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली.

गट क वर्गातील बदलीपात्र यादीकडे बघितल्यास सोबतच या यादीमध्ये २०१८,२०२०,२०२१ व २०२२ मध्ये बदली झालेल्या पण आपल्या बदलीच्या ठिकाणी रुजू न झालेल्या कर्मचाऱ्यांची नावे पुन्हा यादीत आली आहेत.त्यामुळे या बदली झालेल्या कर्मचाऱ्यांनी बदलीच्या ठिकाणी रूजू न होता इतरावर अन्याय करीत मुख्यालयातच आपला बस्तान मांडला आहे.यामुळे यावेळी तरी मुख्य कार्यकारी अधिकारी या कर्मचाऱ्यांना मुख्यालयाबाहेर खरोखरच हलवतात की शासनाचे निर्देश म्हणून बदलीप्रकियेचे सोपस्कार पार पाडतात याकडे लक्ष लागले आहे.

त्यामध्ये सामान्य प्रशासन विभागात कार्यरत टी.के.मंदारकर यांची बदली २०१८ मध्ये झाली,परंतु ते गेल्या पाचवर्षापासून सामान्य प्रशासन विभागातच तळ ठोकून बसले असून बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत.त्यांच्यासोबतच वाय.बी.धावडे यांची बदली २०२०,जिल्हा परिषद हायस्कुल काटीचे एस.ए.काळे यांची बदली २०२१,यांत्रिकी विभागातील आर.एस.राऊत ,प्राथमिक आरोग्य केंद्र मुल्ला येथील आर.एम.हत्तीमरे,पंचायत समिती सालेकसाचे आर.एम.चौधरी,सामान्य प्रशासन विभागातील के.पी.येल्ले,कृषी विभागातील ए.एस.बोपचे,प्राथमिक आरोग्य केंद्र सोनी येथील कु.सविता राठोड व प्राथमिक आरोग्य केंद्र महागाव येथील पी.जी.देशभ्रतार या सर्वांच्या बदल्या २०२१ मध्ये झालेल्या आहेत.त्यास आज दोन वर्षाचा काळ लोटला असून अजूनही ते बदलीच्या ठिकाणी रुजू झालेले नाहीत.विस्तार अधिकारी सांख्यिकीच्या बदलीमध्येही सामान्यप्रशासन विभागाने इतरावंर अन्याय केल्याचे दिसून आले.

बांधकाम विभागात कर्मचारीसंख्या पुर्ण असतानाही अधिकारी वर्गाने कंत्राटदारासोबत मिळून कामे करण्यासाठी तीन ते चार कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती केली आहे.विशेष म्हणजे ३१ मार्चपर्यंत त्यांची मुदत असतानाही ते प्रतिनियुक्तीवर आलेले कर्मचारी आजही बांधकाम विभागात कार्यरत असल्याने मूळ आस्थापनेवर असलेले कर्मचारी मात्र रिकामटेकडे बसले आहेत.त्या प्रतिनियुक्तीवरील कर्मचारीवर्गामुळेच जिल्हा परिषदेत बग्गा प्रकरण घडले असून त्याप्रकरणातही पोलीस विभाग शांत बसल्याने मनोबल वाढल्याची चर्चा आहे.

# साईनाथ नरोटे पोलीस खबऱ्याच, हत्येच्या समर्थनार्थ नक्षलवाद्यांची पत्रकबाजी

**गडचिरोली:** भामरागड तालुक्यातील मर्दहूर येथील साईनाथ नरोटे हा गडचिरोलीत राहून पोलिसांना माहिती पुरवीत असल्यानेच त्याची हत्या केली, असे नक्षलवाद्यांच्या पश्चिम सबझोनल विभागाचा प्रवक्ता श्रीनिवास याने प्रसिद्धीपत्रकात म्हटले आहे. दुसरीकडे, पोलिसांनी नक्षल्यांचे आरोप फेटाळून लावत साईनाथ नरोटे हा खबऱ्या नव्हे तर स्पर्धा परीक्षेची तयारी करणारा उच्चशिक्षित युवक होता, असे म्हटले आहे.नक्षलवाद्यांनी १० मार्च रोजी साईनाथची हत्या केली होती. यासंदर्भात श्रीनिवास याने एक पत्रक जारी केले आहे. साईनाथ हा मागील काही वर्षापासून उच्चशिक्षणाच्या नावाखाली भामरागड व गडचिरोलीत राहत होता. मात्र, प्रत्यक्षात तो पोलिसांना मदत करीत होता. पोलिसांच्या मदतीनेच तो पोलीस भरतीत सहभागी झाला, म्हणून त्याची हत्या केली, असे श्रीनिवासने म्हटले आहे. या हत्येप्रकरणी पोलिसांनी मर्दहूर येथील देविदास गावडे नामक युवकास अटक केली. देविदास हा काही वर्षांपूर्वी नक्षल दलममध्ये कार्यरत होता. त्यानंतर त्याने दलम सोडले. पुढे अनेक वर्षे कारागृहात शिक्षा भोगल्यानंतर तो गावात राहून शेती व ग्रामसभेचे काम करीत होता. पोलिसांनी त्याला नाहक अटक केली. शिवाय गावातील आणखी १० नागरिकांनाही अटक केली, असेही श्रीनिवासने म्हटले आहे.



नक्षल्यांच्या या पत्राला पोलिसांनीही एका पत्राद्वारे चोख प्रत्युत्तर दिले आहे. साईनाथ हा एक गरीब व होतकरू विद्यार्थी होता. तो मागील ३ वर्षांपासून गडचिरोलीत राहून लिपीक, तलाठी, पोलीस व अन्य स्पर्धा परीक्षांची तयारी करीत होता. पोलीस भरतीत २५ हजार युवक, युवतींनी सहभाग घेतला, ते सर्व जण पोलीस खबरीच होते काय? देविदास उर्फ प्रकाश उर्फ आडवे मुरा गावडे नक्षलवाद्यांना सहकार्य करीत होता. साईनाथच्या हत्येत त्याचा सहभाग होता. याप्रकरणी केवळ त्यालाच अटक करण्यात आली असून, गावातील कोणालाही अटक करण्यात आली नाही, असे पोलिसांचे म्हणणे आहे.

## गोंदिया आगाराच्या चालकाची आत्महत्या

**गोंदिया :** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे गोंदिया आगारात कार्यरत चालक खोमेंद्र भोजराज पारधी ३५ वर्ष याने आपले फुलचूर गोंदिया येथील राहते



घराचे स्वयंपाक खोलीत छताचे हुकला इलेक्ट्रिक ताराने गळफास घेऊन आत्महत्या केली. सदर प्रकरण १६ एप्रिल चे सकाळी उघडकीस आल्याने याची सूचना गोंदिया ग्रामीण पोलीस स्टेशनला मिळताच तेथील कर्मचाऱ्यांनी घटनास्थळ गाठून मृतकाचे प्रेत केटीएस रुग्णालय गोंदिया येथे शव विच्छेदना करता पाठवून अकस्मात मृत्यूची नोंद करुन पुढील तपास हवालदार चौधरी करीत असून आत्महत्येचे कारण अज्ञात असले तरी मानसिक तणावातून चालक खोमेद्र पारधी यांनी आत्महत्या केली असावी असा कयास लावल्या जात आहे.

# कुवाढास नाल्यावर पाणओटा बांधकाम सुरु

**सालेकसा:** तालुक्यातील आमगाव खुर्द गावाला लागून कुवाढास नाला वाहतो. या नाल्याला वर्षभर पाणी साचून असते. मात्र या नाल्यावर कुठलाही पाणओटा नसल्याने प्रत्येकाला मनात भिती बाळगून आणि जीव मुठीत धरुन जावे लागत असे. त्यामुळे या नाल्यावर पाणओटे असावे अशा मागणीला घेऊन ओबीसी संघर्ष कृती समितीचे तालुकाध्यक्ष मनोज डोये यांनी कुवाढास नाल्यावर पाणओटे बनविण्यात यावे, असे निवेदनाच्या माध्यमातून मागील चार वर्षांपासून सतत मागणी करत होते. त्यांच्या सततच्या मागणीकडे नगरपंचायतीचे लक्ष केंद्रीत केले आणि अखेर त्यांच्या मागणीला यश आले असून नाल्यावर पान ओट्याच्या बांधकामाला सुरुवात करण्यात आली.



आमगाव खुर्दला लागून असलेल्या कुवाढास नाल्यावर आमगाव खुर्द नगरवाशी तसेच आया-बहिणी धार्मिक कार्यासाठी जसे की, गणपती विसर्जन, कानोबा विसर्जन, दुर्गा विसर्जन तसेच महिला मंडळी काजळतीताच्या कार्यक्रमासाठी जात असतात. मात्र नाल्यावर पाणओटा नसल्यामुळे प्रत्येकाला मनाता भिती बाळगून येथून जावे लागत होते. मात्र या नाल्यावर पानओट्याची निर्मिती करण्यात यावी, अशी मागणी मनोज डोये हे गेल्या ४ वर्षापासून करत होते. त्यांच्या मागणीचा मान ठेवून तसेच नागरिकांची ही गरज लक्षात घेऊन नगरपंचायतीने योग्य ते पाऊल त्यावेळी उचलून अखेर पानओट्याचे काम मागील काही दिवसांपासून सुरु करण्यात आली आहे.

या पान ओट्यामुळे आमगाव खुर्द वासीयांना गणपती विसर्जन, कानोबा विसर्जन, दुर्गा विसर्जन, छट पूजा, कावड यात्रा तसेच महिला मंडळी काजळतीजाचे कार्यक्रम नाल्याच्या पाण्याची खोली विषयी कुठलीही भिती न ठेवता सुरळीत पार पाडतील. तसेच परिसरातील महिलांना या पानओट्याचा कपडे धुण्यासाठी वापर करता येईल. हे पाणओटे जनहिताचे असल्याने नागरिकांच्या उपयुक्त आहे. असे सर्वत्र बोलले जात आहे. या जनहिताच्या घातलेल्या मागणीला पूर्णत्वास नेण्यासाठी ओबीसी संघर्ष कृती समितीचे तालुकाध्यक्ष मनोज डोये यांचे आमगाव खुर्द नगरवासीयांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.

# १६ नामांकित शाळेमधील ८७ शिक्षकांना टॅब मोबाईलचे वाटप

**गोंदिया:-** जिल्हा हा नक्षलग्रस्त आणि अतिसंवेदनशील जिल्हा म्हणून ओळखला जातो. पाहिजे त्या प्रमाणात शिक्षणाच्या सोयी-सुविधा अद्यापही नाहीत. उच्च शिक्षणाकरिता येथील विद्यार्थ्यांना नागपूर किंवा पुणे मुंबईसारख्या शहरात जावे लागते. गोंदिया जिल्ह्याचा शिक्षनाचा दर्जा वाढावा, याकरिता गोंदिया जिल्ह्यात जिल्हा परिषद शाळांमध्ये टॅबचा पुरवठा करण्यात आला आहे. राज्य शासनाच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत हे सर्व टॅब जिल्ह्यातील तंत्रस्नेही शिक्षकांना आणि शाळांना पुरविण्यात आले आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थी या नवीन तंत्रज्ञानाचा वापर करुन शिक्षण घेता येणार आहे.



सध्या दफ्तराचे ओझे वाढले आहे. त्यामळे विद्यार्थ्यांना पुस्तकांच्या व्यतिरिक्त नवनवीन तंत्रज्ञानाची माहिती व्हावी, याकरिता गोंदिया जिल्हा परिषदेने जिल्ह्यातील १६ शाळेतील जे शिक्षक तंत्रस्नेही आहेत. त्यांना हे मोबाईल पुरवठा करण्यात आले आहे. जेणेकरून या टॅब मोबाईलद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ऑनलाईन शिक्षण घेणं सोप होईल तसेच यूट्यूब, दिशा अँप, यांच्या माध्यमातून शिक्षक विद्यार्थ्यांना काही नवीन शिक्षणं देतील जेणेकरून विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या तंत्रज्ञानाची माहिती होईल. इतकेच नाही तर स्पर्धा परीक्षा, नवोदय विद्यालय परीक्षा संदर्भातील माहिती विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होईल. या टॅबच्या सहायाने शिक्षकांनासुद्धा कुठलीही गोष्ट सहज शिकवण सोप होणारे आहे.

या टॅबमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानयुक्त व गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळण्यास मदत होणार आहे. तर शैक्षणिक अँपच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना शिक्षण घेणे अधिक सुकर होणार असून, ग्रामीण भागातील शिक्षणाच्या दर्जा या माध्यमातून आणखी वाढणार आहे. राज्यशासन विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी त्यांना आवश्यक सुविधा पुरविणाऱ्यावर भर देत आहे. त्याअनुषंगाने विद्यार्थ्यांसाठी जिल्हा परिषद, महानगरपालिका, नगरपालिकेच्या शाळांमध्ये पायाभूत सुविधा उपलब्ध करुन त्या शाळांचा स्तर उंचावण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न करण्यात येत आहे

## आदर्श शाळांना केले टॅबचे वाटप

**गोंदिया जिल्ह्यामध्ये राज्य शासनाच्या वतीने समग्र शिक्षा अभियानांतर्गत एकूण ८७ टॅब वाटप करण्यात आले आहेत. गोंदिया जिल्ह्यातील ज्या आदर्श शाळा आहेत अशा शाळांना या टॅब वितरित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षण घेणे अधिक सोयीस्कर झाले आहे.**

# 'आनंदाचा शिधा' त मेलेले उंदिर!

**मोहाडी:** शासनाकडून गोरगरीब कुटुंबांना शंभर रुपयांत दिल्या जाणाऱ्या मआनंदाचा शिधाफ निकृष्ट व बुरशीयुक्त साहित्य वाटप केल्याचा प्रकार मोहाडी तालुक्यातील नेरी येथे उघडकीस आला होता. आता याच तालुक्यातील डोंगरगाव येथेही काही लाभार्थ्यांना निकृष्ट साहित्य वाटप करण्यात आले. एका लाभार्थ्याला तर 'आनंदाचा शिधा'तील पाकीटात मेलेले उंदिर मिळाल्याने संताप व्यक्त होत आहे. शासनाकडून माझी फसवणूक झाल्याचा उद्वेग या लाभार्थ्याने व्यक्त केला आहे.

शासनाकडून गोरगरीब कुटुंबांना शंभर रुपयांत दिल्या जाणाऱ्या मआनंदाचा शिधाफ रवा, डाळ, साखर, तेल हे जिन्नस एकत्रित दिले जात आहेत. काही दिवसांपूर्वी मोहाडी तालुक्यातील नेरी येथे स्वस्त धान्य दुकानातून जवळपास ५० च्या आसपास लाभार्थ्यांना आनंदाचा शिधा वितरित केला होता. लाभार्थी शिधा घेवून घरी पोहोचले तेव्हा चना डाळीच्या पाकिटातून कुबट वास आला तर किडलेली बुरसटलेली निकृष्ट प्रतीची डाळ असल्याचे आढळून आले होते. या प्रकरणाची तक्रार तहसीलदारांकडे करण्यात आली होती. दरम्यान, आता पुन्हा मोहाडी तालुक्यातील डोंगरगाव येथे विजय कुंडलिक भूरे या लाभार्थ्याने मआनंदाचा शिधाफ घरी घेऊन गेले. त्यातील मोठ्या पिशवीत चक्क मेलेले उंदीर मिळाल्याचे भूरे यांनी सांगितले. त्यानंतर डाळीची पिशवी उघडली असता ती डाळ बुरशीयुक्त असल्याचे दिसून आले. अशाचप्रकारे निकृष्ट दर्जाचे जिन्नस अनेक लाभार्थ्यांना मिळाल्याने वाटप करणाऱ्या यंत्रणेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.




**पहिल्या पाकिटातून मेलेले उंदीर मिळाले. डाळीच्या पाकिटात बुरशी डाळीला बुरशी लागली होती. त्यामुळे या आनंदाचा शिधासाठी दिलेले पैसे वाया गेले. एक ग्राहक म्हणून महाराष्ट्र शासनाने माझी फसवणूक केली.**
**-विजय भुरे,** लाभाथी, डोंगरगाव

साप्ताहिक
# बेरार टाईम्स
निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक http://berartimes.com बुधवार, दि.१९ एप्रिल २०२३


## संपादकीय

### तो परत येतोय....

कोरोनाची लाट सुरूहोऊन आज तीन वर्षे उलटून गेली, तरी कोरोनाची दहशत अजून संपलेली नाही, त्यातच आता नवीन लाट येत आहे. देशात एका दिवसात पाच हजारांपेक्षा जास्त रुग्ण आढळून येत आहेत. त्यातच नवीन एच २ एन २ हा नवीन व्हायरस ही धुमाकूळ घालू लागला आहे. म्हणजे आणखी एक नवीन संकट देशापुढे व जगापुढे उभे राहिलेले आहे. जगाने कोरोनाचा समर्थपणे मुकाबला केला. आता ही गरज आहे एकत्रितपणे येऊन न डगमगता मुकाबला करण्याची.
२४ मार्च २०२० रोजी लॉकडाऊन घोषित झाले व नंतर मानवाची एकूणच जगण्याची पद्धतच बदलली. सर्व व्यवहार ठप्प झाले. सर्वांना नाईलाजाने घरी बसणे सक्तीचे झाले. ज्यांना या आजाराची लागण झाली, त्यांना सर्वांपासून वेगळे राहावे लागले. काहींना इस्पितळात ठेवण्यात आले. बऱ्याच जणांचे मृत्यू हे आरोग्याच्या गुंतागुंतीतून झाले. तर कित्येकांचे मृत्यू हे भीतीमुळेच झाले. यावेळी आरोग्य यंत्रणा ही चाचपडताना दिसत होती. कोणावर काय उपचार करावेत. कोणता उपाय प्रभावी हेच त्यावेळी समजत नव्हते. नुसतेच प्रयोग सुरू होते. अशातच तीन-सहा महिने गेले, या काळातच बरीच मित्रमंडळी, ओळखीची माणसे आपल्याला सोडून गेली. स्मशानगृहात कधी नव्हे त्या रांगा लागल्या. आपल्या आप्तस्वकीयांचे अखेरचे दर्शन होणे सुद्धा कठीण होऊन बसले. अखेर तीन-चार महिन्यांनी आरोग्य यंत्रणांना आपला योग्य तो सूर गवसला.अशावेळी तत्कालीन महाराष्ट्रातील महाविकास आघाडीच्या सरकारने कौतुकास्पद काम केले.तत्कालीन मुख्यमंत्री उध्दव ठाकरेसंह पंतप्रधान नरेंद मोदी हे स्वतः या सर्व यंत्रणेकडे जातीने लक्ष ठेवून होते. कोरोना रुग्णालयांची विक्रमी वेळेत उभारणी करणे असो वा आरटीपीसीआरसारख्या महागड्या चाचण्या सर्वांना निदानासाठी वापर करणे, बाधितांवर मोफत उपचार करणे, लॉकडाऊन असल्याने गरिबांना मोफत अन्नपुरवठा करणे, अशी अनेक कामे केंद्र सरकार एकाच वेळी यशस्वीपणे पार पाडत होती. बॅक्टेरिया, व्हायरस, तसेच इतर जीवाणू यास मानवाची प्रतिकार शक्ती चांगली असल्यास मानवास त्रासदायक ठरत नाही, परंतु या साथीचा उद्रेक झपाट्याने झाल्यास तो थोपवणे मग अशक्य बनते, कोरोनाच्या बाबतीत नेमके हेच घडले. बघता बघता हा रोग जगभर पसरला, जगाचे कोणतेच टोक त्याने सोडले नाही. आता तीन वर्षे होऊन गेली तरी तो अजूनही आटोक्यात येण्याचे नाव घेत नाही. अजूनही त्याची दहशत तितकीच आहे, जितकी पूर्वी होती. १६ जानेवारी २०२१ला कोविड विरोधी पहिली लस उपलब्ध झाली होती. केंद्र सरकारच्या प्रयत्नाने तिचे वितरणही देशभर समान पद्धतीने व मोफत झाले होते. ही पहिली लस कोट्यवधी लोकांनी घेतली. तितक्याच लोकांनी दुसरी मात्रा घेतली तर खूपच कमी लोकांनी तिसरा बुस्टर डोस घेतला. गेली तीन वर्षे आपण कोरोनाच्या दहशतीखाली काढली, या काळात आपल्या शरीरात व मानसिकतेतही बदल झाला आहे. व्हायरसमध्ये जसे म्युटेशन होते, तसे ते आपल्या शरीरातही होत असते, आता आपले शरीर या कोरोना आजाराचा सामना करण्यासाठी जास्त सज्ज झाले आहे. आपल्या मानसिकतेतही आता बराच बदल झाला आहे, तरी पण बेफिकीर न राहाता आता अजूनही पूर्वीसारखी काळजी घेणे तितकेच जरुरीचे आहे. हल्ली आजार हे खूप खर्चिक झाले आहेत, याचा कोरोना काळात खूप वाईट अनुभव सर्वांना आला, सरकारी इस्पितळे हाऊसफुल्ल झाली होती, ज्यांना सरकारी इस्पितळात बेड मिळाले नाहीत, त्यांनी खासगी इस्पितळात धाव घेतली तेथे त्यांचे बिल लाखा-लाखांमध्ये गेले, कित्येकांनी आपली आयुष्यभराची पुंजी ओतून टाकली तर कित्येकजण कर्जबाजारी झाले. कित्येक जण जीवनातून उठले. कोरोनाचे निदान करण्यासाठी लागणारी आरटीपीसीआर ही चाचणी करण्यासाठी हजारो रुपयांना लुटले गेले. कोरोनाची पहिली लाट आली, दुसरी लाट आली, अशा कित्येक लाटा येतील असे भविष्य वर्तविले गेले होते. आता मात्र एक लाट आपल्यासमोर उभी ठाकली आहे.
आपले शरीर आता कोरोनाचा सामना करण्यासाठी जास्त सज्ज झाले आहे. मृत्यूचे भय ही आता कमी झाले आहे. आपली काळजी आता आपणच घेतली पाहिजे. आपली प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी योग्य आहार- विहार, साधी जीवनशैली, योग, ध्यानधारणा याचा अवलंब केला पाहिजे, दररोज स्वतःसाठी वेळ काढला पाहिजे, योग्य वेळी समतोल आहार घेणे व जीवनातील ताणतणाव टाळून मन नेहमी प्रसन्न ठेवावे एवढ्या साध्या गोष्टी तरी करता आल्या तर कराव्यात. आपण बघितले की कोरोनाचे मृत्यूचे प्रमाण आता कमी कमी होत जात राहिले आहे, डॉक्टरांचा योग्य तो सल्ला घेतला तर कोरोना पोझिटिव्ह हा रुग्ण ही सुखरूप कोणतीही गुंतागुंत न होता बाहेर पडू शकतो. आता ही गरज आहे समर्थपणे मुकाबला करण्याची. तरी तो अजूनही आटोक्यात येण्याचे नाव घेत नाही. अजूनही त्याची दहशत तितकीच आहे. जितकी पूर्वी होती.
आपली प्रतिकारशक्ती वाढविण्यासाठी योग्य आहार विहार, साधी जीवनशैली, योग, ध्यानधारणा याचा अवलंब केला पाहिजे, दररोज स्वतःसाठी वेळ काढला पाहिजे, योग्य वेळी समतोल आहार घेणे व जीवनातील ताणतणाव टाळून मन नेहमी प्रसन्न ठेवावे. एवढ्या साध्या गोष्टी तरी करता आल्या तर कराव्यात. सध्या वातावरणीय बदलामुळे इतर संसर्गजन्य आजारामध्ये डोके वर काढत असतात. त्यात कोरोना कोणता व वायरल आजार कोणते यात गल्लत होण्याची संभावना अधिक असते. जर गरज वाटेल तेव्हाच कोरोनाची चाचणी करणे उत्तम.साथ कमी झाल्यावर लोकांचा ही लसीकरणाचा उत्साह कमी झाला. आजही असे नागरिक आहेत की, ज्यांनी पहिला डोस ही घेतला नाही, अज्ञान, गैरसमज याने ते आपला धोका वाढवीत आहेतच; परंतु दुसऱ्यांच्या जीवास ही धोका निर्माण करत आहेत अशा व्यक्ती आता आपणच शोधून काढून त्यांचे मतपरिवर्तन करून त्यांना लस घेण्यास प्रवृत्त केले पाहिजे.

# वाशिम जिल्ह्यातील सत्यशोधक समाज व सत्यशोधक कार्यकर्ते

धानोरा घाटगे: आजच्या मानोरा तालुक्यातील व पुर्वीच्या मंगरूळपीर तालुक्यातील एक आडवडणाचे गाव की ज्या गावात आजी जाताना गाव कधी येते याची वाट पाहावी लागते. १९२९ साली प्रकाशीत झालेल्या सत्यशोधक महासाधू, श्री तुकाराम महाराज या हरिश्चंद्रराव नारायणराव नवलकर (नवीव संपादन डॉ. अशोक चोपडे) यांच्या पुस्तकामध्ये दिलेल्या माहितीनुसार या गावी श्री समाजसेवक मंडळ भगतीश्रम या नावाने स्थापन झाला आहे. या सत्यशोधक शाखेचे अध्यक्ष श्री. श्रीराम महाराज घाटगे पाटील तर सेक्रेटरी श्री.रामभाऊ विश्वनाथ भगत, वीरशैर लिंगायत वाणी समाज हा वर्तमानपत्रे आणि पुस्तकाद्वारे समाजनांचा फैलाव करीत आहे.

विठोली या सत्यशोधकी गावापासून काही अंतरावर गालम गाव असून तेथून पुढे चिखली व तेथून एका आडवाटेला धानोत घाटगे नावाचे गाव आहे. या यागावी घाटगे मंडळी जास्त प्रमाणात असल्यामुळे गावाला धानोरा घाटगे म्हणून ओळखले जाते. या गावातील निलकंठ पांडुरंग घाटगे यांची मुलाखात घेतली परंतु बळीराम महादगी घाटगे कोण होते हे कळू शकले नाही. परंतु येथील शाखेचे सेक्रेटरी रामभाऊ विश्वनाथ भगत यांचे नातू प्रविण व धनराव भगत भेटले. त्यांनी रामभाऊ विश्वनाथ भगत यांची डायरी दिली. त्या डायरीत भगत यांनी वाचलेल्या पुस्तकांची यादी होती. त्यामध्ये दिनचित्रकार मुकुंदराव पाटील यांचे ढढाशास्त्री परान्ने, त्यांनी १९३५ साली वाचले. नव्या मनुतील मराठा, मराठा क्षत्रीयांचा इतिहास, क्षत्रियांचा इतिहास, भाग (१),(२) ही काशीराव बापू देशमुख यांची पुस्तके १९३७ साली वाचली.

मुर्तीपुजेचा निषेध, मुर्तीपुजेचे अनिष्ठ परिणाम, शिवाजी कोण? महात्मा फुलेंचे चरित्र, गोवरंजारे लोकांचा इतिहास, खरा वारकरी, भाऊबंदकी, सत्यशोधक जलसा शिक्षक असे सत्यशोधक ब्राम्हणेत्तर चळवळीशी संबंधीत असणाऱ्या लेखकांचा ग्रंथ त्यांच्या वाचण्यात आले होते. त्याचाच परिणाम म्हणून त्यांनी गावात येवून कार्य केले असे दिसते. १९२६ ते २८ साली ते मराठी नॉर्मल स्कूल अमरावती येथे शिकण्यास होते. त्यामध्ये त्र्यंबक नारायण नायगावकर होते. १९२५ साली अमरावतीला ब्राम्हणेत्तर परिषद झाली होती. तिचाही प्रभाव त्या काळात त्यांच्यावर पडला असावा. ते प्राथमिक शिक्षक होते. त्यांना परिसरात गुरुजी म्हणून ओळखले जात असे ते गावात पुरोहीताचे कार्य करीत असते.

मांगुळ झनक: रिसोड तालुक्यातील या गावी आताचे काँग्रसचे विद्यमान आमदार अमित सुभाषराव झनक यांचे पणजोबा गोपाळराव आनंदराव झनक पाटील त्या काळातील प्रसिद्ध सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचे पुत्र ॲड. रामराव झनक, माजी आमदार हे ब्राम्हणेत्तर चळवळीचे आयाजी पाटील यांचे जावई होते. आयाजी पाटील आणि पंढरीनाथ पाटील यांचे गुरुशिष्यांचे संबंध होते. गाडगेबाबांचे किर्तन विधीवत त्यांनी १ मे १९३६ ला तब्बल २०२ पोत्यांचा भंडारा करुन त्यांचे किर्तन घडवून आणले होते. (सत्यशोधक मित्र प्रल्हाद पौळकर यांच्या माहितीवरुन) तसेच याच गावी शेतकरी परिषद १९३८ झाली. आनंदस्वामी यांच्या अध्यक्षततेच्या उपस्थितीत पार पडली होती. त्यावेळी बरीच ब्राम्हणोत्तर सत्यशोधक ते या गावी आले होते. गोपाळराव झनक यांच्या पुढील तीन पिढ्यांनी मंडणी-रिसोड विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधीत्व केले आहे.

पाळोदी,ता.मानोरा: या वाशीम जिल्ह्यातील गावी सत्यसमाजाचे म्यानेजर रा. शिवराम नारायण पाटील हे पुढारी दहा जलशाचे व्यवस्थापक होते. पाळोदी, ढोणी, रूई, शेंदुरवाफा, हळदा, शिवणी, देयूक, वाराजहांगीर, वाडी, भरसुळ या गावी त्यांची जलसे स्थापना केले होते. (दिनमित्र २३ जाने १९२९), त्याचप्रमाणे त्यांनी १९३३ साली सत्यशोधक समाजाची शाखा कोंडोली ता.मानोरा (पुर्वीचा मंगरूळपीर) येथे स्थापन केली होती. शिवराम



सतीश जामोदकर
हिवरा बु.मानोरा, वाशिम मो.९४२३३७४६७८

पाटील यांच्याविषयी आज रोजी कोणतीही माहिती मिळत नाही. परंतु हिवरा बु.ता.मानोरा येथे आले. ि

शिवराम पाटील गावळे असावे असे भास्कर पाटील यांनी सांगितले. परंतु अधिकृत माहिती मिळाली नाही.

वार्डा इजारा, ता.मानोरा: या वाशीम जिल्ह्यातील गावी गंधर्व विवाह हजारदा भोंळ्या विधवा मुलीचव सत्यसमाज पद्धतीने झाला होता. याच गावी सत्यशोधक लोकशाहीर काशीनाथराव वार्डेकर होऊन गेले. त्यांचा जन्म २३/१२/१९०२ रोजी झाला. त्यांच्या वडीलांचे नाव माधवराव व आईचे नाव सईबाई यांच्या पोटी झाला. अखिल भारतीय ब्राम्हणेत्तर परिषद अमरावतीत पार पडत आहे हे त्यांची वाचले आणि ते त्या परिषदेला हजर राहिलेत. राजाराम महाराज यांच्या भाष्यांचा त्यांच्यावर परिणाम झाला. विधवेचे केशवपण, पती निधनानंतर तिच्या संपत्तीचे होणारे हरण, अन्याय, अत्याचार रुढी, परंपराच्या नावाखाली जातीयता व अस्पृश्यता या गोष्टींनी त्याच मत व्यथीत झाले. त्यांनी सुरु केलेल्या ब्राम्हणेत्तर चळवळीत मंगरुळपीर-मानोरा परिसरात जीवाभावाचे काही सहकारी मित्र सुद्धा लाभले होते. त्यामध्ये विठोली येथील रामजी हागे पाटील, भुताराम तेली, कुपट्याचे बळीराम लोहार व मंगरूळपीर येथील बाबुराव महार (श्रृंगारे) हे होते. (भिमराव श्रृंगारे यांच्या आठवणीवरुन) तसेच रामभाऊ रुपली, मारोती बुधे, माधवराव तऱ्हाळकर, मोतीराम आभळे (तऱ्हाडा) इत्यादी होते. त्यांचे शिक्षण मंगरुळपीर येथे नगर परिषद शाळा क्र.१ मध्ये झाले. वार्डा या गावी त्यांनी स्वतःची विहिर अस्पृश्य बांधवांना पिण्याच्या पाण्याकरिता खुली केली. हनुमानाच्या पारावर अस्पृश्य बांधवांना घेऊन गेले. त्यांनी गावात व इतर ठिकाणी प्रबोधनपर शाहीरीचे कार्यक्रम घडवून आणले होते. ते स्वातंत्र्य चळवळीत सुद्धा कार्यरत होते. पुढे ते मंगरूळपीर येथे वास्तव्यास आले व येथेच त्यांचा मृत्यू झाला.

दोनद बु.ता.कारंजा: आजच्या वाशीम जिल्ह्यात व पुर्वीच्या मुर्तीजापूर तालुक्यात व अकोला जिल्ह्यात सध्याच्या कारंजा-वर्धा-नागपूर हायवेवर असलेले छोटेशे गाव आहे. या खेड्यात श्री. शिवराम पांडुरंग जैस्वाल (कलाल) यांचा जन्म २०-११-१९०९ रोजी झाला. त्यांचे शिक्षण त्यांच्या आतेबहिणीकडे दारव्हा या ठिकाणी झाले. ७ वी पर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर ते गावी आले. आणि शेती करु लागले. त्यांच्या पत्नीचे नाव अन्नपूर्णा होते. त्यांना समाजसेवेची आवड असल्याने त्यांनी गावात मानवधर्म सुधारक मंडळ कढले. या मंडळीच्या कार्याने प्रभावीत होऊन त्यांनी अंधश्रद्धा, जादुटोना, मुर्तीपूजा यावर टीका केली. कलापथकाच्या प्रभावातून त्यांनी साहित्य निर्मीती केली. १९३६ साली पुराव मुर्तीपुजेचा निषेध या पुस्तीकेचा जन्म झाला. या पुस्तीकेचा स्वतंत्र भारताचे पहिले कृषीमंत्री डॉ.भाऊसाहेब देशमुख यांनी प्रस्तावना लिहिली होती. त्यानंतर पुरापर या सदरखाली पोवाडा लिहिला. गावात ग्रामपंचायत स्थापन झाली तेव्हा त्या पंचायतीचे ते पहिले सरपंच झाले. त्यांनी या ग्रामपंचायतीच्या माळीत वाचनालय सुरु केले होते. त्यांना बिऱ्हाडे या नावने सुद्धा ओखळले जाते. म्हणजे दोनना बिऱ्हाडे गावातील गृहस्थ, वैदिक पुंच्यायतन पूजा नावाचा पोवाडा त्यांनी लिलीला. त्यांचे लिखाण सत्यशोधक जलशाच्या आधारावर होते. त्यांचे चिरंजीव नागपूरास्थित ओंकार शिवरामजी जैस्वाल यांनी त्यांच्याविषयी माहिती दिली. त्यांचा मृत्यू १५/०१/१९९५ साली झाला. ते वैद्यकीय व्यवसाय सुद्धा करीत असत. त्यांना तीन मुले होती.

# पौष्टिक तृणधान्य काळाची गरज

संयुक्त राष्ट्राने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष घोषित केले आहे. याचाच एक भाग म्हणून गोंदिया जिल्ह्यातही विविध स्तरावर आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष साजरे केले जात आहे. कुपोषण समस्या व पोषणमूल्य सुधारण्यासाठी मिलेटचा आहारात वापर पुन्हा एकदा वाढविणे, त्यांची लागवड वाढविणे, त्यांच्या उपयुक्ततेबाबत समाजात जनजागृती करणे अत्यंत जरुरीचे आहे. याबाबत कृषी विभागाच्या वतीने जिल्ह्यात जनजागृती करण्यात येत आहे. तृणधान्याची लागवड व त्याचा आहारात समावेश आरोग्यासाठी गरजेचा आहे ही बाब शेतकरी व नागरिकांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून पटवून देण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या कृषी महोत्सवात पौष्टिक तृणधान्य या विषयावर जिल्ह्यातील महिला बचतगटांनी सकस आहार ही स्पर्धा आयोजित करुन नागरिकांना तृणधान्याचे महत्त्व पटवून दिले.

नवीन पिढीच्या व लहान मुलांच्या आवडीचे पदार्थ जसे की, ब्रेड, बिस्किट, केक, इडली, डोसा, चकली इत्यादी पदार्थ पौष्टिक तृणधान्यावर प्रक्रिया करुन बनविता येतात. असे पदार्थ बनवून त्यांचा आहारात समावेश वाढविणे आवश्यक आहे. त्यास तृणधान्य वर्षाच्या निमित्ताने मदत होईलच. भारताने २०२३ हे वर्ष आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष म्हणून साजरे करण्याचे उचललेले पाऊल हे भारताच्याच नव्हे तर, सर्व जगाच्या पोषण आणि आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत गरजेचे आहे.



**मिलेट म्हणजे काय?**

मिलेट अर्थात बारीक दाणे येणारे, माणसांना, प्राण्यांना आणि पक्षांना खाण्याजोगे पौष्टिक तृणधान्य/भरडधान्य. भारताच्या विविध प्रांतात होणारे आणि पूर्वपार चालत असलेले आपले मुख्य अन्न म्हणजे मिलेट होते. ज्वारी, बाजरी, नाचणी, कोदू, वरी, राजगीरा, राळ, कांग, सावा हे त्यांचे विविध प्रकार. आरोग्यासाठी पोषक मिलेट्स वापरातून मिळणारे आवश्यक पोषकांश-मिलेट्स किंवा पौष्टिक तृणधान्य/ भरडधान्य हे शरीरातील आम्लता कमी करणारे असून, ते ग्लुटेन विरहित, अत्यंत पोषक आणि पचनास सुलभ आहेत.

मिलेट्सचा ग्लासेमिक इंडेक्स कमी असल्याने रक्तातील साखर संतुलित राखण्याचे कार्य तृणधान्य करतात. आहारातील यांच्या वापरामुळे वजन कमी होण्यास मदतच होते. कॅल्शियम, आयर्न, झिंक, फॉस्फरस, मॅग्नेशियम, पोटॅशियम आदी महत्त्वाची शरीरावश्यक घटक द्रव्ये याच्यातून आपल्याला मिळतात. त्याचबरोबर आवश्यक तंतूमय पदार्थ म्हणजे फायबर्स, फॉलिक सिड, विटामिन बी ६, बीटा कॅरोटीन, बी -१ आणि चेतातंतूंचे कार्य अधिक सक्षम बनविण्यास लागणारे लेसिथिन याचे उत्तम स्त्रोत म्हणजे ही तृणधान्ये किंवा मिलेट्स असतात.

**आहारात बाजरीचा समावेश**

आहारातील बाजरीचे तृणधान्यात जास्तीत जास्त ऊर्जा देणारे पिक आहे. यामुळे कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित करते. मॅग्नेशिअम व पोटॅशिअमचा उत्तम स्त्रोत-रक्तदाब नियंत्रीत करण्यास मदत होते तसेच वजन नियंत्रित करण्यास सुध्दा मदत होते. बाजरीमध्ये सल्फरयुक्त अमिनो आम्ल असल्यामुळे लहान मुले व गर्भवती मातांसाठी उपयुक्त आहे. यामुळे हिमोग्लोबीन वाढण्यास मदत होते. हृदयास सक्षम बनवते. मधुमेह व कॅन्सर रोधक असते. आपल्या शरीरातील हाडांना मजबुती देण्याचे काम करते.

केंद्र शासनाच्या कृषि व शेतकरी कल्याण विभागाने पौष्टिक तृणधान्य पिकांच्या उत्पादनात वाढ करणे, तृणधान्यांमधील पोषणमुल्यांमुळे त्यांचे आहारातील अनन्यसाधारण महत्व विचार घेऊन लोकांच्या आहारातील त्यांचा वापर वाढविण्याच्या दृष्टीने मुल्यवधीत उत्पादने तयार करणे अभिप्रेत असल्यामुळे रोजच्या आहारात पौष्टिक तृणधान्याचा वापर करा व निरोगी राहा. खऱ्या अर्थाने पौष्टिक तृणधान्य - सशक्त महाराष्ट्र ही संकल्पना साध्य होण्यास मदत होणार आहे.

**जिल्हा माहिती कार्यालय, गोंदिया**

## मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजना; वैयक्तिक शेततळ्यासाठी ७५ हजारांचे अनुदान

**गोंदिया :** कृषी आयुक्तालयाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना वैयक्तिक शेततळे मिळणार आहेत. विविध आकारमानाच्या शेततळ्यासाठी कमाल रक्कम ७५ हजार रुपये अनुदान आहे. या योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन कृषी विभागामार्फत करण्यात आले आहे.

मुख्यमंत्री शाश्वत कृषी सिंचन योजनेअंतर्गत समाविष्ट विविध आकारमानाच्या शेततळ्यापैकी कोणत्याही एका शेततळ्याकरिता मागणी अर्ज महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन पध्दतीने भरल्यानंतर लॉटरी पध्दतीने लाभार्थ्यांची निवड होईल. ऑनलाईन अर्ज मोबाईल, लॅपटॉप, सामुदायिक सेवा केंद्र, ग्रामपंचायती मधील सामुदायिक सेवा केंद्र यासारख्या माध्यमातून http://mahadbtmahit.gov.in या संकेतस्थळावर जाऊन करता येतो. शेततळ्याचा लाभ संरक्षित सिंचन क्षेत्रासाठी रब्बी, उन्हाळी पिकांना सरंक्षित पाणी देण्यासाठी होऊ शकेल, त्याचप्रमाणे मत्स्यपालन पशुसंवर्धनासाठी होऊ शकेल. त्यासाठी २३ रुपये ६० पैसे शुल्क ऑनलाईन भरावयाचे आहे. सोडतीतून निवड झालेल्या शेतकऱ्यांना त्याच्या जमिनीचा सातबारा, अ उतारा, आधारकार्ड झेरॉक्स, बँक पासबुक झेरॉक्स, हमीपत्र, जातीचा दाखला महाडीबीटी पोर्टलवर विहीत मुदतीत अपलोड करावा लागेल.

निवड झालेल्या शेतक-यांच्या शेतात कृषी अधिकारी भेट देतील, तसेच छाननी अंती पात्र ठरलेल्या शेतक-यांना कार्यारंभ आदेश ऑनलाईन पध्दतीने निर्गमित करण्यात येईल. शेततळ्याला लागणारी जागा शेतकऱ्यांनी स्वखुशीने व विनामुल्य द्यावयाची आहे. या योजनेचा लाभ घेण्याकरिता शेतकऱ्यांनी यापूर्वी कुठल्याही शासकीय योजनेतून शेततळे व सामुहिक शेततळे या घटकाकरिता लाभ घेतलेला नसावा.

महाडीबीटी प्रणालीवर एकाच वेळी अनेक शेतकऱ्यांचे अर्ज येतात, त्यामुळे ज्यांची निवड झाली ते वगळून उर्वरित शेतकऱ्यांची प्रतिक्षा यादी लावली जाते. त्यानुसार टप्याटप्प्याने त्यांची निवड केली जात असल्यामुळे प्रत्येकवेळी संबंधीत शेतकऱ्यांनी अर्ज करावयाची आवश्यकता नाही.

इच्छुक लाभार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर मुदतीत मोठ्या प्रमाणात अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंदुराव चव्हाण यांनी केले आहे.

# भारतातील विविध भूमापन पद्धती

भारतातील जमिनींची मोजणी १० एप्रिल १८०२ रोजी सुरूझाली. त्यामुळे हा दिवस राष्ट्रीय भूमापन दिन म्हणून साजरा करण्यात येतो. यानिमित्त भारतातील विविध भूमापन पद्धतींवर नगर भूमापन अधिकारी श्री. किरण कांगणे यांनी टाकलेला प्रकाशझोतः

आपल्याला कधीतरी हे प्रश्न पडले असतील की, गुंठा म्हणजे काय? जमीन मोजणीची गुंटूर पद्धत म्हणजे काय? माऊंट एव्हरेस्ट या जगातील सर्वात उंच शिखराचे एव्हरेस्ट नाव कशामुळे पडले? पूर्वी मोजणी व शेतसारा कर पद्धत कशी होती? त्यावेळी गुंटूर नावाचा ब्रिटिश अधिकारी होता. त्याने ३३ गुणिले ३३ अशी जमीन मोजणीची नवी पद्धत रूढ केली. त्यामुळे त्याचे स्मरण म्हणून या क्षेत्रफळाच्या जमिनीला १ गुंठा असे नाव पडले व त्या मोजणीला गुंटूर पद्धत असे म्हणू लागले.

जमीन मोजणीच्या सुरूवातीच्या काळात जॉर्ज एव्हरेस्ट नावाचा अधिकारी होता. त्याने कन्याकुमारी ते काश्मीर हे अंतर मोजले. तसेच जगातील सवोच्च शिखराची उंची मोजली. त्यात त्याला अतोनात परिश्रम झाले व त्यातच त्याचे निधन झाले. त्याचीच आठवण म्हणून जगातील सर्वोच्च उंच शिखराला त्याचे नाव देण्यात आले.

राज्यकारभार चालविण्यासाठी जमिनीच्या एकूण उत्पन्नापैकी काही अंश कर म्हणुन घेण्याची पद्धत पुरातन काळापासून आहे. भारतामध्ये इ.स. पूर्वीच्या राजवटीमध्ये जमीन महसूलाची निश्चित पद्धत होती. भारतात जमिनीचे सर्वेक्षण व नकाशे तयार करण्याची प्राचीन परंपरा आहे. मनुस्मृती व ब्रह्मांडपुराणातही त्याचा उल्लेख आढळतो. भारतीय इतिहासात सिंधु संस्कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्याकाळाची नियोजनबद्ध संरचना मोहेंजोदडो व हडप्पा येथील उत्खननात मिळालेल्या अवशेषात दिसून येते. शंखापासून बनविलेल्या कोनमापक यंत्राचा व ओळंब्याचा वापर माणसाने त्याकाळी केला आहे.

मौर्य साम्राज्यामध्ये जमिनीची मोजणी व नोंदणी ठेवण्यासाठी "रज्जूक" नावाचा अधिकारी नेमला जाई. जमीन मोजणीसाठी दोरीचा प्रथम वापर केला गेला. मौर्यांच्या काळात संस्कृतमधील "रज्जूक" यावरुन "रज्जूक" हा शब्द प्रचलित झाला. कौटिल्याच्या म्हणजेच आर्य चाणक्याच्या अर्थशास्त्रामध्ये जमिनीची मोजणी, प्रतवारी, सर्वेक्षण करुन तिचे कोरडी, बागायत, ओलसर अशा प्रकारे प्रतवारी करुन जमिनीचा प्रकार, सिंचन सुविधा व त्यावरील पिकांच्या आधारे तिच्यावरील कराची निश्चिती केली जात असे.

जमिनीची मालकी व कर रचना असणारी महसूल पद्धत दिल्लीचा बादशहा शेरशहाने इ.स.१५४० ते १५४५ दरम्यान अवलंबली. त्याच्या कारकिर्दीमध्ये प्रत्येक जमीनधारकाची तसेच प्रत्येक हंगामातील प्रत्येक पिकाची नोंद करण्यात आली. हा महसूल काटेकोरपणे गोळा केला जाई. जमीनधारकाचे हक्क व त्याची जबाबदारी याचा स्पष्ट उल्लेख या करारनाम्यात मोगल बादशहा अकबराने त्याचा मंत्री तोरडमल याच्या मदतीने कर पद्धतीची फेर उभारणी केली. त्याने जमीन मोजणीसाठी प्रथमच काठी व साखळीचा वापर केला. क्षेत्रफळासाठी बिघा हे परिमाण ठरविण्यात आले व जमिनीची उत्तम, मध्यम व निकस या तीन प्रकारे विभागणी करण्यात आली.

जमिनीच्या एकूण उत्पन्नापैकी १/३ हिस्सा कर म्हणून घेतला जाई. त्याचे चलनामध्ये मूल्यांकन करून मागील १९ वर्षांच्या सरासरी इतके पुढील १० वर्षांसाठी करपात्र उत्पन्न ठरविले जात असे. मंत्री तोरडमलची पध्दत दक्षिणेकडे निजामाचा दिवाण अहमदनगरचा वजीर मलिक अंबर यानेही सन १६०५ते १६२६ या काळात काही सुधारणासह विकसीत केली. त्यांनी जमीन मोजणीच्या वरील पद्धती कायम ठेवल्या. जमीन धारकाचे मालकी हक्क व सत्ता प्रकाराची पद्धत अंमलात आणली.

छत्रपती शिवाजी महाराजांचा काळ म्हणजे सन १६७४ पासून जमीन महसूल आकारणीसाठी ङ्गखेडेङ्ग हे एकक वापरले जात असे. पीक उत्पादन करणाऱ्यांची क्षमता पाहून कर आकारणी (शेतसारा) बसविला जाई. या पद्धतीला "कमालधारा" म्हटले जाई. प्रत्येक गावात मामलेदार हे देशमुख, देशपांडे, वतनदार व पाटील यांच्या मदतीने जमीन महसूल गोळा करण्याचे काम करत असत. दुसऱ्या बाजीरावाच्या काळात ही पद्धत बंद झाली. याच काळात मामलेदार या पदाचा लिलाव सुरूझाला.

मराठेशाहीमध्ये इनाम, वतन व मिरास हे शब्द जमिनीच्या महसूल आकारणीशी निगडीत होते. याद्वारे जमिनीची मालकी व महसूल आकारणीचे अधिकार देण्यात येत होते. हे अधिकार वंश परंपरागत होते. अशा प्रकारे भारताच्या विविध प्रांतांमध्ये मोजणी व शेतसारा कर वेगवेगळ्या पद्धतीने अंमलात होते.

१८ व्या शतकाच्या शेवटी पुण्याच्या उत्तरेस भीमा नदीपासून तापी नदीकाठच्या बहरानपूर विस्तृत भूप्रदेश प्रथमतः नकाशात बसविला. नकाशामध्ये सातपुडा डोंगररांगा, अजंठा टेकड्या, महत्त्वाची गावे व नद्या सांकेतिक पद्धतीने दाखविल्या आहेत. याच दरम्यान नाशिक शहराचा नकाशा सर्वप्रथम केला गेला आहे.

ब्रिटिशांनी सन १७५७ पर्यत भारतीय भूभागावर वर्चस्व मिळविले. परंतु ब्रिटिश हे व्यापारी म्हणून भारतात आले होते. त्यांना व्यापारी दृष्टीकोनातुन भारतामधून उत्पन्न हवे होते आणि भारतामध्ये जमीन हे उत्पन्नाचे महत्त्वाचे साधन होते. म्हणून ब्रिटिशांनी उत्पन्न मिळविण्याकरिता जमिनीची शास्त्रशुद्ध पद्धतीने सर्वेक्षण व कर आकारणी सुरू केली. या दृष्टीकोनातून ब्रिटिशांनी सन १७६७ मध्ये सर्व्हे ऑफ इंडियाची स्थापना केली व या पदावर सर्व्हेअर जनरल ऑफ इंडिया म्हणून जेम्स रनेल यांची नियुक्ती करण्यात आली. जेम्स रनेल लिखीत ""Bengals Atlas" या पुस्तकात शंकु साखळीने जमिनीची मापे आणि खगोल शास्त्रीय माहिती याचा एकत्रित आधार घेऊन नकाशे तयार केले असा उल्लेख आहे.

सर लॅम्टन यांनी दक्षिण भारतातील केपकामोरिन येथून १० एप्रिल १८०२ मध्ये त्रिकोणमितीय भूमापनाची सुरुवात केली होती. ही सुरवात मद्रास (चेन्नई) जवळील थॉमस पर्वतापासून केली. भूमापनाच्या कामात सर जॉर्ज एव्हरेस्ट यांनी मोठी मदत केली. सर जॉर्ज एव्हरेस्ट भूमापक प्रमुख व त्रिकोणमितीय भूमापनाचे अधीक्षक होते. १८३० मध्ये त्यांची भूमापन कामाचे अधीक्षक म्हणून नेमणूक झाली. जॉर्ज एव्हरेस्ट यांना "सर्व्हेअर जनरल बहादूर' असे संबोधले जाऊ लागले. भारतीय भूखंडाचे मोजणीचे काम चालू असताना कर्नल लॅम्टन यांचा मृत्यू झाला. बरेच भूकरमापक मोजणी वेळी शरणागती झाले. त्यांची इतिहासात नोंद नाही. जनता याबाबत अनभिज्ञ आहे. पुढे हे काम जॉर्ज एव्हरेस्ट यांनी ३३ वर्षात पूर्ण केले. अशा प्रकारे भारतीय भूखंडाचे मोजणी काम एकूण ३७ वर्षात पूर्ण झाले.

सन १८१८ मध्ये जेव्हा ब्रिटिशांनी मराठ्यांकडून सत्ता काबीज केली, त्यावेळी दक्षिण विभागाचे राजकारणी कमिशन माउन्ट स्टूअर्ट एल्फिन्स्टन यांनी रयतवारी पद्धतीचा पाया घातला. ब्रिटिशांच्या कारकिदीत दुसरी महत्त्वाची गोष्ट करण्यात आली ती म्हणजे शेत जमिनीची शास्त्रशुद्ध पद्धतीने गुंटर नांवाच्या अधिकाऱ्याने अंमलात आणलेल्या शंकू साखळीने मोजणी करण्यात आली. म्हणून शंकू साखळीस गुंटर चैन, गुंठा असे म्हणत. सदर साखळी ३३ फुट लांबीची असून १६ भागांत विभागली आहे. त्या प्रत्येक भागाला आणा म्हणत व गुंटर साहेबांच्या नावावरुन पुढे गुंठा प्रचलित झाला. ४० गुंठ्याच्या जमिनीच्या क्षेत्राला एक एकर म्हणत असे.जमीन महसूल ठरविण्याचा पहिला मान पुणे जिल्ह्यातील इंदापूर तालुक्यातील भिगवण येथून प्रिंगले नावाच्या सहाय्यक जिल्हाधिकारी यांनी सन १८२७मध्ये मिळविला.

सध्या अस्तित्वात असलेली जमीन महसूल आकारण्याची पद्धत ब्रिटिश राजवटीत ठरवून दिलेल्या पद्धतीनुसार आहे. भूमापन पुस्तिका व नगर भूमापन पुस्तिका यामध्ये सविस्तर मोजणी पद्धती दिल्या आहेत. इंग्रजांच्या काळात शंकू साखळी पद्धतीने मोजणी केली जायची. नंतर प्लेन टेबल मोजणी होत असे. नंतर ए.ढ.ड ने मोजणी केली जायची, आता रोव्हर या अत्याधुनिक तंत्राद्वारे अक्षांश व रेखांशने मोजणीचे काम केले जाते.

### रोव्हरद्वारे मोजणीची वैशिष्टे/फायदे

**रोव्हरद्वारे मोजणी अर्धा तासात होते. मनुष्यबळ कमी लागते, कमी श्रमात मोजणी काम होते. पूवी एका हेक्टरसाठी एक दिवस लागत असे. आता अर्ध्या तासात मोजणी होते. अडचणी येत असत. या मोजणीची अचूकता १५ सेंटिमीटरची आहे. अक्षांश, रेखांश कायम स्वरुपी राहणार आहेत. नकाशावरील असल्यास जी. पी. एस. द्वारे मोबाईद्वारे जमिनीच्या मिळकतीची सीमा पाहू शकता. अशा अत्याधुनिक रोव्हर यंत्रणेचा वापर होत असल्याने तत्परतेने मोजणी होते.**




स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# “शासकीय योजनांची जत्रा” पोहोचणार शेवटच्या व्यक्तीपर्यंत-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे

**गोंदिया :** राज्य शासन सामान्य जनतेसाठी विविध लोकोपयोगी योजना राबवीत आहे. सामान्य जनतेला शासकीय योजनांची माहिती, अर्ज केल्यावर लाभ कसा मिळतो, कुठे अर्ज करावा: कागदपत्रे काय जोडावीत: याची माहिती नसते. यामुळे काहीजण शासकीय योजनांपासून वंचित राहतात. याचा विचार करुन शासकीय योजना गतिमान आणि शेवटच्या व्यक्तीपर्यंत पोहोचविण्यासाठी “शासकीय योजनांची जत्रा’ हा उपक्रम राज्यभर सुरू करण्याचा निर्णय शासनाने घेतला असून लवकरच हा उपक्रम गोंदिया जिल्ह्यात राबविण्यात येणार आहे. या उपक्रमाचा जास्तीत जास्त गरजूंना लाभ मिळावा यासाठी प्रत्येक विभागाने काटेकोर नियोजन करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी दिले. शासकीय योजनांची जत्रा याबाबत आज आढावा बैठक घेण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.



मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, अपर जिल्हाधिकारी सुभाष चौधरी, निवासी उपजिल्हाधिकारी स्मिता बेलपत्रे व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

प्रत्येक विभागाने आपल्या अधिनस्त येणाऱ्या योजना व त्यांच्या लाभार्थींची तात्काळ यादी बनवावी. लाभार्थींची निवड तातडीने करावी. प्रलंबित अर्ज निकाली काढावे. लाभार्थ्यांकडून योजनेचे अर्ज भरून घ्यावे. नवीन अर्ज स्वीकारावे, ज्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज भरले जातात अशा गरजूंना अर्ज भरण्यासाठी मदत करावी अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी केल्या. हा उपक्रम जिल्हा व तालुकास्तरावर राबविण्यात येणार आहे.

प्रशासन, शासन आणि जनता एकत्र आल्यास सामान्य जनतेच्या कोणत्याही समस्या राहणार नाहीत, हे हेरुन शासकीय योजनांची अंमलबजावणी गतीमान करण्यासाठी एकाच छताखाली सर्व अधिकारी-जनता जत्रेच्या रुपात आणून जनतेला विविध योजनांचा लाभ मिळवून देणार आहेत. या जत्रेनुसार सर्व विभागांनी आपापल्या योजनांची माहिती, शासन निर्णय याबाबत पूर्वतयारी करावी. योजनानिहाय लाभाथी निवड, त्यांचे अर्ज भरुन घेणे याबाबतही तयारी करावी.

लाभार्थींना जलद, कमी कागदपत्रामध्ये आणि शासकीय निर्धारित शुल्कात योजनेचा लाभ देण्यात येणार असून या उपक्रमात सर्व विभागांचे अधिकारी, कर्मचारी एकाच छताखाली एकाच ठिकाणी येऊन गरजूंना शासकीय योजनेचा लाभ देणार आहेत. यामध्ये योजनांचा लाभ मिळवून देणे, आवश्यक कागदपत्रे प्रमाणित करणे, योजनांची माहिती देणे हा मूळ उद्देश या जत्रेचा आहे. जत्रेत एकाच योजनेचा लाभ मिळणार नसून यामध्ये त्या कुंटुंबाला अन्य योजनांचीही माहिती होणार आहे. यामुळे विविध योजनांचा लाभ एकाच गरीब कुंटुंबाला झाल्यास ते कुटुंब दारिद्र्यरेषेच्या वर यायला हातभार लागणार आहे. यामुळे या जत्रेत प्रत्येक विभागांनी आपल्या विविध योजनांबाबत माहितीही पुस्तक रुपाने प्रसिद्धीस देण्याच्या सूचनाही त्यांनी केल्या.

जत्रेच्या माध्यमातून अधिकाऱ्यांना थेट जनतेशी संवाद साधता येणार आहे. यामुळे जनतेच्या समस्या जवळून पाहता येणार असल्याने त्या समस्येवर उपाययोजना करता येणार आहेत. सर्व नियोजन मुख्यमंत्री जनकल्याण कक्षामार्फत करण्यात येणार असून गावपातळीवरील कर्मचाऱ्यांच्या मार्फत योजनांची माहिती ङ्घहर घर दस्तकफ्च्या रुपाने देता येणार आहे. यामध्ये सर्व यंत्रणांचा समावेश राहणार आहे. यासोबतच सीएससी सेवा सेंटर, स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवक यांचीही मदत घेण्यात येणार आहे. प्रत्येक विभागांनी त्यांच्या पात्र लाभार्थ्यांची निवड करुन योजनांचा जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले.

या योजनांचा मिळणार लाभ- सीमांत शेतकरी गट बांधणी व गटनोंदणी, कृषी अभियांत्रिकीकरण योजना, शेती कीट, बाजार कीट, फवारणी कीट, इ-श्रम कार्ड, स्वनिधी योजना, इमारत बांधकाम योजना, रेशन कार्ड, आयुष्यमान कार्ड, संजय गांधी व श्रावण बाळ योजना, ज्येष्ठ नागरिक कार्ड, जात प्रमाणपत्र, रहिवासी, उत्पन्न, जन्म व मृत्यू इत्यादी दाखले, गोपीनाथ मुंडे शेतकरी अपघात विमा योजना, बचतगटांना लाभ, हेल्थ कार्ड, गायी, म्हशी व शेळी मेंढी वाटप, महिलांना शिलाई मशीन वाटप, महालँब योजना, रोजगार मेळावा, वीज जोडणी, माती परीक्षण, अण्णासाहेब पाटील व इतर महामंडळांच्या योजना, शिकाऊ चालक परवाना, दिव्यांग साहित्य वाटप, महिलांना “सखी’ कीट वाटप, डिजिटल इंडिया अंतर्गत शासनाच्या डिजिटल सुविधांची माहिती व प्रशिक्षण, कृषी प्रदर्शन, शेतकरी ते ग्राहक थेट बाजारपेठ, नव मतदार नोंदणी, मुलींना सायकल वाटप, मनरेगा, जि.प. व कृषी विभाग विभागाच्या घरकुल योजना, प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया उद्योग, विवाह नोंदणी, पी.एम. किसान योजना, आधार कार्ड, पॅन कार्ड, पासपोर्ट, शासकीय कर्मचारी आस्थापना विषयक प्रलंबित बाबी व सेवानिवृत्ती विषयक लाभ व कृषी सेवा केंद्राचे परवाने यासह इतर सर्व शासकीय योजनेचा लाभ देण्यात येणार आहे.

नागरिकांना आवाहन- वैयक्तिक व सामूहिक लाभाच्या ज्या शासकीय योजनेचा लाभ नागरिकांना घ्यावयाचा आहे त्यासाठी तात्काळ त्या विभागाकडे अर्ज करावा. “शासकीय योजनांची जत्रा’ या उपक्रमात लाभ देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. ऑनलाईन योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करावा. जनकल्याणाच्या सर्व योजना शासन आपल्यापर्यंत पोहोचविणार आहे. या उपक्रमाला नागरिकांनी व लाभार्थ्यांनी सहकार्य करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.

# ५३७ ग्रामपंचायतींना २३.३२ कोटीचा निधी उपलब्ध

**गोंदिया:** शासनाने ग्राम पंचायतीच्या विकासावर भर देण्याकरीता जिल्ह्यातील ग्राम पंचायतींसाठी १५ व्या वित्त आयोगातंर्गत निधी उपलब्ध करुन दिला आहे. पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाचा २०२२-२३ या आर्थिक वर्षांच्या बंधित निधीचा (टाइड ग्रंट) स्वरूपातील दुसऱ्या हप्त्याचा निधी केंद्र शासनाकडून वर्ग करण्यात आला आहे. यामध्ये गोंदिया जिल्ह्याकरिता २३ कोटी ३२ लाख ६१ हजारांचा निधी उपलब्ध झाला आहे. यात ग्रामपंचायतींकरिता १८ कोटी ६२ लाख ८२ हजार, पंचायत समित्यांसाठी २ कोटी ३४ लाख ८७ हजार तर जिल्हा परिषदेसाठी २ कोटी ३४ लाख ९२ हजारांचा निधी उपलब्ध झाला आहे. या निधीतून जिल्ह्यातील आठ पंचायत समित्यांतर्गत ५३७ ग्रामपंचायतीत पायाभूत कामे केली जाणार आहेत. यात प्रामुख्याने स्वच्छ व हागणदारीमुक्त गाव व पिण्याच्या पाण्यासाठी हा निधी खर्च केला जाणार आहे.

केंद्र शासनाच्या वतीने १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या माध्यमातून स्थानिक स्वराज्य संस्थांना विकासकामे करण्यासाठी निधी उपलब्ध करून दिला जातो. २०२२-२३ या आर्थिक वर्षातील दुसरा हप्ता आता केंद्र शासनाने राज्याला दिला आहे. हा निधी पंचायत राज संस्थांना म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींना अनुक्रमे १०




: १० : ६ : ८० या प्रमाणात वितरित करण्यात येत आहे. ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, संनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांच्यावर राहणार आहे.

ज्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरावर म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक कार्यरत आहेत, अशा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाचे वितरण करण्यात आले नाही. ज्या ठिकाणी प्रशासक नाहीत, अशाच स्थानिक स्वराज्य संस्थांना हा निधी देण्यात आला आहे. या पंधराव्या वित्त आयोगाच्या वितरित निधीतून पंचायतराज संस्थांनी ग्रामपंचायत विकास आराखड्यानुसार कामे व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावयाची आहे. गावातील सध्याच्या परिस्थितीचे विषण करून गावाच्या गरजांची निश्‍चिती करून कामे ठरविण्याचे अधिकार ग्रामसभा व ग्रामपंचायतीला आहेत. या निधीचा वापर पायाभूत सेवांसाठी करावयाचा आहे.

यात प्रामुख्याने स्वच्छता आणि हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल-दुरुस्ती करणे, पेयजल पाणीपुरवठा, रेन वॉटर हार्वेस्टिंग, वॉटर रिसायकलिंग आदी कामासाठी हा निधी खर्च करावयाचा आहे.

एकूण निधीपैकी ५० टक्के निधी हा वरील कामासाठी खर्च करावयाचा आहे. वरील कामे पूर्ण झाली असल्यास दुसऱ्या कामावर हा निधी खर्च करता येणार आहे. उपलब्ध झालेल्या निधींपैकी जून २०२३ अखेरपर्यंत किमान ५० टक्के खर्च करावा, ५० टक्के खर्च झाल्याशिवाय केंद्रीय वित्त आयोगाकडून पुढील हप्त्याचे वितरण केले जाणार नाही, असे आदेशही शासनाने काढले आहेत

# जबलपूर-गोंदिया-जबलपूर पॅसेंजर रेल्वे सुरु

**गोंदिया:** दक्षिण पूर्व मध्य रेल्वे मंडळांतर्गत जबलपूर-गोंदिया-जबलपूर पॅसेंजर विशेष रेल्वेगाडीला गोंदिया येथून १७ एप्रिल रोजी शुभारंभ झाला. खासदार सुनील मेंढे यांनी हिरवी झेंडी दाखवून गाडीला जबलपूरला रवाना केले.



जिल्ह्यासह मध्यप्रदेशातील अनेक खेडेगावातील गोंदिया ते जबलपूर दरम्यान पॅसेंजर रेल्वेगाडी सुरु होण्याची प्रतिक्षा होती. ती पूर्ण झाली असून १७ एप्रिल रोजी जबलपूर-गोंदिया-जबलपूर मार्गावर विशेष पॅसेंजर रेल्वेगाडीचे परिचालन करण्यात आले. या वेळी संबंधित क्षेत्राचे लोकप्रतिनिधी व प्रवाशांनी रेल्वेगाडीचे स्वागत केले. १८ एप्रिल पासून ही गाडी नियमीत धावणार आहे. या रेल्वेगाडीचा या मार्गावरील ३८ रेल्वेस्थानक जोडले जाणार आहे. सकाळी ६ वाजता जबलपूर येथून सुटणार असून दुपारी दीड वाजता गोंदियात पोहचेल. तर रात्री १० वाजता गोंदिया येथून सुटणार असून मध्यरात्री ३.२० वा जता जबलपूरला पोहचेल. या गाडीत २ शयनयान व ८ सामान्य असे १० डब्बे राहणार आहेत.

# अभ्यासिका वर्गाने धर्मेंद्रचे स्वप्न साकार

**आमगाव:** आमगाव येथील आदर्श सार्वजनिक वाचनालय प्रशासनाने तालुक्यासह नगरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करता यावी, या उद्देशाने अभ्यासिका वर्ग सुरू केले. वाचनालयाचा उद्देश आणि मोठ्या पदावर जाण्याचे स्वप्न उराशी बाळगणाऱ्या काळीमाती येथील धर्मेंद्र गिऱ्हेपुंजे याने साकार करुन दाखविले. धर्मेंद्र गिऱ्हेपुंजे याची कृषी विभागात उपसंचालक पदी निवड झाली आहे. धर्मेंद्र याने जिल्ह्यातील युवकांपुढे एक आदर्श निर्माण केला आहे.



जिद्द व चिकाटीच्या बळावर ग्रामीण भागातील विद्यार्थी मोठ्या पदावर आपली नियुक्ती व्हावी, असे स्वप्न उराशी बाळगतात. मात्र स्थानिक स्तरावर तसेच वातावरण किंबहुना अभ्यासिका एवढेच नव्हेतर स्पर्धा परीक्षेसाठी आवश्यक पुस्तकांची जुळवाजुळव होत नसल्याने ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थ्यांचे स्वप्न अपुर्ण राहतात. परंतु, दुसरीकडे विद्यार्थ्यांचे स्वप्न साकार करण्यासाठी काही सार्वजनिक वाचनालय पुढाकार घेत आहेत. आमगाव येथील आदर्श सार्वजनिक वाचनालय यांनी सुरू केलेल्या अभ्यासिका वगार्चा लाभ आता ग्रामीण भागातील विद्यार्थी घेवून लागले आहे. हे काळीमाती येथील धर्मेद्र गिऱ्हेपुंजे यांनी सिध्द करून दिले आहे.

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाकडून घेण्यात आलेल्या राज्य कृषीसेवा परीक्षेची धर्मेंद्र युवकराम गिऱ्हेपुंजे यांनी अभ्यासिका वर्गाच्या माध्यमातून तयारी केली. दरम्यान त्याने परीक्षा उत्तीर्ण केली. धर्मेंद्र याची कृषी विभागात उपसंचालक पदी निवड झाली आहे. धर्मेंद्र गिऱ्हेपुंजे याने यश संपादन केल्याबद्दल आमगाव तालुक्यातील गणमान्याकडून अभिनंदन केले जात आहे.

# स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासन व आदिवासी यांच्यामधील दुवा म्हणून काम करावे-अपर आयुक्त आदिवासी विकास रवींद्र ठाकरे

**गोंदिया:** आदिवासी विकास विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध विकासाच्या योजना ग्रामीण भागातील गरीब व गरजू आदिवासी लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासन व आदिवासी यांच्यामधील दुवा म्हणून काम करावे, असे आवाहन अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर रवींद्र ठाकरे यांनी केले. एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प देवरी यांच्यातर्फे गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी जमाती प्रवर्गातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य यांची बैठक अपर आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. उपायुक्त आदिवासी विकास दशरथ कुळमेथे, प्रकल्प अधिकारी देवरी विकास राचेलवर यावेळी उपस्थित होते.



प्रकल्प कार्यालयाच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या आदिवासी कल्याणाच्या योजनांची माहिती पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचणे गरजेचे आहे, असे सांगून श्री. ठाकरे म्हणाले की, स्थानिक लोकप्रतिनिधींनी स्वतःहून पुढाकार घेऊन आपल्या भागातील व गावातील आदिवासी बांधवांपर्यंत योजनांची माहिती पोहोचवावी व लाभ मिळवून द्यावा असे आवाहन त्यांनी केले. यासाठी प्रकल्प अधिकारी कार्यालय आपणास सहकार्य करेल अशी ग्वाही त्यांनी दिली.

प्रकल्प कार्यालयीन सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून विषयनिहाय सर्व शाखेतील प्रलंबीत प्रकरणांचा व प्रलंबीत पत्रव्यवहार यांचा आढावा व दप्तर तपासणी यावेळी करण्यात आली. प्रलंबीत प्रकरणांचा तात्काळ निपटारा करण्याच्या दृष्टीने कार्यालयातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना त्यांनी निर्देश दिले.

आदिवासी समाज भवन, देवरी येथे प्रकल्प कार्यालयाअंतर्गत येत असलेल्या शासकीय आश्रमशाळेचे मुख्याध्यापक, अधिक्षक, महिला अधिक्षीका तसेच शासकीय आदिवासी मुला-मुलींचे वसतीगृहातील गृहपाल यांची संयुक्त सभासुद्धा श्री. ठाकरे यांनी घेतली. मागील दोन वर्षांपासून आश्रमशाळेमध्ये विविध उपक्रम राबविण्यात येत असून या उपक्रमात किती विद्यार्थ्यांची प्रगती झाली याबाबतचा आढावा घेण्यात आला.

यावर्षी सुध्दा पुन्हा एक नविन उपक्रम सुरु करीत असून यामध्ये उन्हाळी अभ्यासक्रम घेवून विद्यार्थ्यांचा शैक्षणीक दर्जा कसा वाढवता येईल यादृष्टीने ११ एप्रिल ते ९ मे २०२३ पर्यन्त उन्हाळी अभ्यासक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये (शासकीय व अनुदानित आश्रमशाळा) प्रथम टप्पा वर्ग ९ ते १२ सुरु करण्यात आले असून दुसऱ्या टप्प्यामध्ये शासकीय आश्रमशाळेतील वर्ग ९ ते १२ वी कला व विज्ञान शाखेचे सर्व विद्यार्थी ५ जून ते २५ जून २०२३ पर्यन्त सहभागी होतील असे त्यांनी सांगितले.

बी.ए., एम.ए. व स्पर्धा परिक्षेची तयारी करत असतांना एवढ्यावरच समाधान न मानता इतर क्षेत्रामध्ये सुध्दा खूप मोठया प्रमाणात संधी असुन वैज्ञानिक, संशोधन, इंजिनिअर, डॉक्टर, इतर क्षेत्रात सुध्दा पुढे जाण्याचे आवाहन दशरथ कुळमेथे यांनी केले. आपल्याच शाळेत शिक्षण घेतलेला डॉ. भाष्कर हलामी, वरिष्ठ संशोधक, अमेरिका येथे कार्यरत आहे व गजानन भलावी, व्यवसायीक हे अत्यंत कठीण परिस्थीतीमधून ग्रामीण भागातुन उंच भरारी घेत आहेत. यांचेपासुन आदिवासी बांधवानी प्रेरणा घेवून विविध क्षेत्रात प्रगती करण्याचे आवाहन त्यांनी केले.

गोंदिया जिल्हयाच्या इतिहासात प्रथमच जेईई मेन सारख्या कठीण पात्रता परिक्षेत जिल्हयातील एकलव्य मॉडेल रेसिडेन्शियल स्कुल, बोरगाव/बाजार येथील १७ आदिवासी विद्यार्थ्यांनी यश संपादीत केले व आपल्या प्रतिभेचा झेंडा रोवला आहे, ही गोंदिया जिल्हयाकरीता गर्वाची बाब असल्याचे विकास राचेलवार यांनी सांगितले. यावर्षी देवरी प्रकल्पातून २० विद्यार्थ्यांना भारतीय अंतराळ संशोधन संस्था “इस्त्रो” करीता अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

न्युक्लिअस बजेट योजना संदर्भात अ व ब गट योजना च्या माध्यमातून आदिवासी बांधवाचे समाजिक स्तर उंचावण्यासाठी व गरजू आदिवासी बांधवांना लाभ देवून गरीबी दूर करण्याकरीता नागपूर विभागामधून सर्वात ज्यास्त निधी देवरी प्रकल्प कार्यालयास प्राप्त झाला आहे. सन २०२१-२२ यावर्षी शबरी घरकुलाचे एकुण लक्षांक ७६४ होते परंतु सन २०२२-२३ मध्ये १५०० शबरी घरकुलाचे लक्षांक गोंदिया जिल्हयाकरीता आणल्याचे त्यांनी सांगितले.

सदर बैठकीस सविता पुराम, सभापती महिला व बाल कल्याण जि.प गोंदिया, अंबीका बंजार सभापती पंचायत समिती देवरी, सविता कोडापे सभापती प.स सदस्य अर्जुनी मोरगाव, रजनी कुंभरे जि.प सदस्य जिल्हा परिषद गोंदिया, प्रमिला भलावी पंचायत समिती सदस्य तिरोडा, श्यामकला गावळ सदस्य पं.स. देवरी, वैशाली पंधरे पं.स.सदस्य, सुनिता दिहारी पं.स.सदस्य, ममता अंबादे सदस्य पं.स देवरी, डॉ.नाजूक कुंभरे पं.स.सदस्य, भाग्यश्री सयाम पं.स.सदस्य, शिला उईके नगरसेवक देवरी, हनवत वट्टी जि.प. सदस्य आमगाव, रितेशकुमार मलघाम सदस्य जि.प.गोंदिया, दिलीप जुडा ढिवरीटोला सरपंच तसेच यासह सर्व अनुसूचीत जमाती प्रर्वगातील जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, ग्रामपंचायत सदस्य, सरपंच, उपसरपंच उपस्थित होते. प्रकल्प कार्यालयाचे सहाय्यक प्रकल्प अधिकारी हरिश्चंद्र सरियाम यांनी सभेचे संचालन व आभार प्रदर्शन केले.

## ग्राम पंचायत कार्यालय कारूटोला पंचायत समिती सालेकसा

**जा.क्र.०९/२०२३ निविदा सुचना क्र.१ (पहिली वेळ) सन २०२३-२४**

**दि. १८/०४/२०२३**

| अ.क्र. | तपशील | नग |
|---|---|---|
| 1 | कॉम्पुटर 1) (Processor) I 3 10 th Generation 2) (Ram) 8 G.B, 3) (HARD DISK) 1 T.B. 4) (Graphic Card) 2 G.B. | १ |
| 2 | प्रिंटर H.P. कंपनी (Print,Scan,Copy) | १ |
| 3 | स्मार्ट LED टी.व्ही. 32* | १ |
| 4 | ट्राली स्पीकर | ४ |
| 5 | स्ट्रीट लाईट 36 Vat | २५ |

१) निविदा प्रकशित दिनांक- १८/०४/२०२३
२) निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक- २५/०४/२०२३
३) निविदा उघडण्याचा दिनांक (शक्य झाल्यास)- २५/०४/२०२३

इच्छूक पुरवठा धारकांना कळविण्यात येते की, आपली निविदा सरपंच ग्रा.पं.कारूटोला च्या नावाने दिनांक २५/०४/२०२३ पर्यंत पोहचते करावे. दिनांक २५/०४/२०२३ नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. करिता जाहीर कळविले आहे.

**ग्राम विकास अधिकारी**
ग्राम पंचायत कारूटोला

**सरपंच**
ग्राम पंचायत कारूटोला

आज़ादी का अमृत महोत्सव | महाराष्ट्र शासन | G20

# महामानव

आपले आदर्श : आपली प्रेरणा

१४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर
(१४ एप्रिल १८९१-६ डिसेंबर १९५६)

- सामाजिक न्याय विभागाच्या योजनांसाठी १६ हजार ४९४ कोटी रुपयांची तरतूद.
- भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या इंदू मिल येथील भव्य स्मारकाचे काम प्रगतिपथावर.
- रमाई आवास योजनेंतर्गत ग्रामीण व शहरी भागाकरीता १ लाख ५० हजार घरकुलांचे उद्दिष्ट निश्चित.
- बार्टीच्या सर्व प्रशिक्षणाच्या योजना प्रभावीपणे राबविणार.
- बार्टीतर्फे देण्यात येणारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय संशोधन अधिछात्रवृत्ती ८६१ विद्यार्थ्यांना देण्याचा निर्णय मंजूर.
- सामाजिक न्याय विभागांतर्गत येणारी महामंडळे व बार्टीमार्फत आगामीकाळात एक लाख युवक-युवतींना रोजगाराभिमुख प्रशिक्षण मिळणार.
- जागतिक स्तरावर रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्यासाठी बार्टीमार्फत फ्रेंच, रशियन, जपानी, जर्मन आणि स्पॅनिश या भाषांचे शिक्षण देणार.
- संजय गांधी निराधार व श्रावणबाळ योजनेतील अर्थसहाय्यात १००० रुपयांवरून १५०० रुपये वाढ.
- ज्येष्ठ नागरिकांसाठी राष्ट्रीय वयोश्री योजनेचा विस्तार आणि प्रत्येक महापालिका क्षेत्रात विरंगुळा केंद्र.

## असामान्य, अद्वितीय महामानवाला जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन!



नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

देवेंद्र फडणवीस
उपमुख्यमंत्री

एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

https://mahasamvad.in | /MahaDGIPR | /MaharashtraDGIPR | माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

# जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन-जिल्हाधिकारी

**गोंदिया :** अल्प व अत्यल्प जमीन असणाऱ्या शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी केंद्र शासनाने सुरु केलेली प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना महाराष्ट्र राज्यात १ डिसेंबर २०१८ पासून राबविण्यास सुरुवात झाली आहे. या योजनेत पुढे केंद्र सरकारने बदल करुन सरसकट सर्वांना या योजनेचा लाभ देण्याचे आदेश देण्यात आले. सदर योजनेअंतर्गत केंद्र शासनाने निकष शिथील केल्याने लाभार्थी शेतकरी कुटूंबांच्या संख्येत मोठी वाढ झाली आहे. शेतकरी कुटूंबासाठी दोन हेक्टरची मर्यादा रद्द केल्याने सरसकट शेतकरी कुटूंबे या योजनेसाठी पात्र ठरली असून एकप्रकारे वरदान ठरत आहे. तरी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा जास्तीत जास्त प्रमाणात लाभ घेण्याचे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.

सदर योजना जिल्हास्तरावरुन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत पर्यवेक्षण करण्यात येत असून शेतजमीन असणाऱ्या कुटूंबाला प्रती हप्ता २ हजार रुपये म्हणजेच वार्षिक ६ हजार रुपये अर्थसहाय्य दिले जाते. जिल्ह्यातील लाभार्थ्यांच्या खात्यात केंद्र सरकारच्या माध्यमातून आधारबेस विविध हप्त्यात थेट पैसे जमा करण्यात येत असल्याची माहिती सदर योजनेचे समन्वयक मारोती केंद्रे यांनी दिली आहे.

पीएम किसान सन्मान निधी योजनेअंतर्गत सरकार पात्र शेतकऱ्यांना ६ हजार रुपयांची आर्थिक मदत पुरवते. ही मदत शेतकऱ्यांना त्यांच्या पिकांसाठी बियाणे, खत आणि इतर इनपुट साहित्य खरेदी करण्यासाठी मदत करण्यासाठी दिली जाते. पात्र शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचे हप्ते दर चार महिन्यांनी जारी केले जातात आणि शेतकऱ्यांच्या नोंदणीकृत खात्यात जमा केले जातात.




पाषाण युगापासून आधुनिक जगात मानवजातीचे संक्रमण होऊनही जमिनीचे मालकी अधिकार, सत्ता आणि समृध्दीचे प्रतिक राहिले आहे. कृषी क्षेत्राने उत्पादन आणि सेवा क्षेत्राची चमक गमावली असली तरी, ती अजुनही देशाच्या अन्न सुरक्षा व्यवस्थेचा कणा आहे. भारतातील ५० टक्के रोजगार प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे कृषी आणि संबंधित क्षेत्रांशी संबंधित असल्याने सरकार विविध मार्गांनी शेतकऱ्यांना प्रोत्साहन आणि समर्थन देण्यासाठी देखील उत्सुक आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजना ही अशीच एक योजना आहे जिथे शेतकऱ्यांना सहाय्यक आर्थिक मदत दिली जाते. लहान आणि अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या उत्पन्नाच्या क्षमतेला पाठिंबा देण्यासाठी पीएम किसान योजना लॉन्च करण्यात आली आहे.

शेत जमिनीची व्याख्या अशी केली जाऊ शकते जिथे झाडे आणि पिके घेतली जातात. ही लागवड स्वावलंबी आणि व्यावसायिक दोन्ही कारणांसाठी असू शकते. शेतीची तंत्रे देशानुसार भिन्न असतात आणि सामान्यत: त्या देशातील हवामान, पाण्याची उपलब्धता आणि अन्न प्राधान्यांवर परिणाम होतो. भारत सरकारने कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग देखील स्थापन केला आहे आणि पीएम किसान सन्मान निधी योजना सारख्या सबसिडी योजना आणल्या आहेत. तरी जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# समग्र शिक्षा कर्मचाऱ्याच्या जिल्हातंर्गत रखडलेल्या बदल्यांचा प्रश्न मार्गी लावा

**गोंदिया:–** जिल्हा परिषदेच्या समग्र शिक्षा अभियानांतर्गत तालुकास्तरावर तसेच डायट कंत्राटी कर्मचाऱ्याचा जिल्हातंर्गत प्रशासकीय बदल्यांचा रखडलेला प्रश्न एप्रिल ते मे महिन्यात मार्गी लावण्यात यावे अशी मागणी जिल्ह्यातील समग्र शिक्षा कर्मचाऱ्यानी केली आहे. या मागणीचे निवेदन जिपचे मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प.अध्यक्षासंह, शिक्षणाधिकारी यांना देण्यात आले आहे.



निवेदनानुसार, दरवर्षी देवरी, सालेकसा, आमगाव, अर्जुनी–मोरगाव, सडक अर्जुनी या तालुक्यात कार्यरत कर्मचारी जिल्हा परिषदेला बदली संदर्भात निवेदने देतात. परंतु सर्व साधारण क्षेत्रात व स्थानिक तालुक्यात कार्यरत कर्मचारी स्थानिक राजकीय मंडळींकडे जाऊन जिल्हा परिषदेवर बदल्या न करण्याबाबत दबाव आणतात. त्यामुळे मागील चार वर्षांपासून जिल्हांतर्गत बदल्या झालेल्या नाहीत. त्यामुळे सन २०१९ च्या मार्गदर्शन पत्रानुसार अवघड क्षेत्रात कार्यरत कर्मचाऱ्यांच्या जिल्हातंर्गत प्रशासकीय बदल्या एप्रिल व मे महिन्यात करण्यात याव्यात. तसेच तसेच समग्र शिक्षाअंतर्गत जिल्ह्यातील चार तालुक्यात रिक्त असलेले एमआयएस समन्वयक व डाटा एन्ट्री ऑपरेटरचे पदे एमपीएससी कडून परवानगी घेऊन भरण्यात यावे, अशी मागणीही अधिकारी व पदाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

हे निवेदन शिक्षणाधिकारी व डायट प्राचार्यांना ही देण्यात आले. या वेळी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांना २०१९ च्या मार्गदर्शन पत्रासह प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना दिल्या असून प्रशासकीय बदल्या करणे हे प्रशासनाचे काम आहे व ते आम्ही करणार असल्याचे सांगितले. तसेच जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिकारी (प्राथ.) यांच्याशी चर्चा करण्याचे आश्वासन दिले. निवेदन देतेवेळी वशिष्ठ खोब्रागडे, प्रदीप शरणागत, अंकला माने, राजेश मते, प्रमोद सिंगनजुडे, रवी पटले आदी कर्मचारी उपस्थित होते.

समग्र शिक्षा कर्मचाऱ्यांच्या या पूर्वी झालेल्या बदल्या व सन २०१९ च्या मार्गदर्शक पत्राचे अवलोकन करुन बदली बाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचविल्या प्रमाणेनक्कीच बदलीची कार्यवाही करण्यात येईल, असे जि.प.चे शिक्षणाधिकारी डॉ. महेंद्र गजभिये यांनी सांगितले.

# आरोग्यवर्धिनी केंद्र उद्घाटनाच्या प्रतीक्षेत




**सालेकसा:** तालुक्यातील गोर्रे येथे तालुक्यातील पाचवे आरोग्यवर्धिनी केंद्र (प्राथमिक आरोग्य केंद्र) मागील सात वर्षापुर्वी मंजूर झाले आहे. परंतु ते अद्यापही सुरु झाले नाही. चार वर्षापुर्वी आरोग्यवर्धिनी केंद्राची इमारत तयार झाली तरी या इमारतीचे लोकार्पण झाले नाही. परिणामी, गोर्रे परिसरातील पाच ग्रामपंचायतींच्या १८ गावातील जवळपास १३ हजार नागरिकांना उपचारासाठी पायपीट करावी लागत आहे.

गोर्रे परिसरातील जनतेच्या प्रदीर्घ मागणीवरुन येथे आरोग्य विभागाने आरोग्यवर्धिनी केंद्र मंजूर केले. या प्राथमिक आरोग्य केंद्रात पाच ग्रामपंचायतींच्या १८ गावातील १३ हजार लोकांना आरोग्य सेवा मिळणार होती. २८ एप्रिल २०१७ ला आरोग्यवर्धिनी केंद्राची मंजूरी मिळाली. त्यानंतर आरोग्य विभागाकडून त्यासाठी आवश्यक पदेसुद्धा मंजूर करण्यात आली. मत्र, प्राथमिक आरोग्य केंद्र कुठे सुरु करायचे हा एक प्रश्न होता. त्यामुळे १६ जुन २०१७ ला आरोग्यवर्धिनी केंद्राची इमारत मंजूर करण्यात आली. इमारतीचे काम सुरु झाले. ३० जुलै २०१९ रोजी आरोग्यवर्धिनी केंद्राची इमारत बनवून तयार झाली. आता फक्त या ठिकाणी आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु करण्याची गरज होती. त्यासाठी डॉक्टर, नर्स आणि इतर आवश्यक पदेसुद्धा मंजूर करण्यात आली. परंतु नवीन इमारतीचे लोकार्पण झाले नव्हते. दरम्यान, राज्यात विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागल्यामुळे इमारतीचे लोकार्पण थंड बस्त्यात गेले आणि प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु होऊ शकले नाही. निवडणुकीनंतर नवीन सरकार स्थापन झाले. पालकमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करायचे होते. परंतु नियमित पालकमंत्री लाभले नाही व उद्घाटना मुहूर्त मिळाला नाही. महाविकास आघाडीचे सरकार कोसळल्यानंतर २०२२ जून महिन्यात राज्यात शिंदे–फडणवीस सरकार स्थापित झाले. परंतु या सरकारला पालकमंत्री नियुक्त करण्यातच बाच कालावधी निघून गेला. परिणामी उद्घाटनाचा मुहूर्त काही निघाला नाही. बऱ्याच कालावधीनंतर राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदी निवड करण्यात आली. परंतु त्यांनाही जिल्ह्याकडे लक्ष देण्यासाठी वेळ नाही. परिणामी या आरोग्यवर्धिनी केंद्राचे लोकार्पण लांबले आहे.

### उपचारासाठी करावी लागते धावाधाव

लोकार्पणाचा मुहूर्त काढण्याच्या नादात एकीकडे परिसरातील १३ हजार नागरिकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागत आहे. तर दुसरीकडे मागील चार वर्षात आरोग्य विभागाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले नाही. आवश्यक आरोग्य कर्मचाऱ्यांची सोय असुनसुद्धा तात्पुरत्या स्वरूपात प्राथमिक आरोग्य केंद्र सुरु करायला पाहिजे होते. परंतु तसे करण्यात आले नाही. परिणामी या परिसरातील गावकऱ्यांची उपचारासाठी दूरवरची पायपीट कायम आहे.

### लोकप्रतिनिधी उदासीन

गोर्रे येथील आरोग्यवर्धिनी केंद्र सुरु व्हावे या परिसरातील नागरिकांना उपचारासाठी करावी लागणारी भटकंती दूर व्हावी यासाठी स्थानिक लोकप्रतिनिधींनी सुद्धा कुठलाच पाठपुरावा केला नाही. केवळ भूमिपूजर करण्यातच त्यांचा वेळ जात असल्याने या महत्वपूर्ण विषयाकडे लक्ष देण्यासाठी त्यांच्याकडे वेळ नसल्याचे चित्र आहे. परिणामी, याचा त्रास जनतेला भोगावा लागत आहे.

## मास्कचा वापर करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

**गोंदिया, :** जिल्ह्यात कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असून दिवसेंदिवस कोविड सकारात्मक रुग्णांची संख्या वाढतांना दिसत आहे. मंगळवारी रोजी १८ रुग्ण सकारात्मक निघाले आहेत. एकूण सकारात्मक रुग्णांची संख्या ७४ वर पोहचली आहे. कोरोना रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता नागरिकांनी गदीच्या ठिकाणी मास्क वापरावा असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.

कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव व प्रसार रोखण्याकरीता मास्कचा वापर हे प्रभावी साधन आहे. सर्व नागरिकांनी घराबाहेर निघाल्यानंतर मास्कचा वापर करावा, असे आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केले आहे.मास्कच्या वापरासह कोविडबाबत योग्य वर्तवणूक करावी. गदीच्या आणि बंदिस्थ ठिकाणी विशेषत: सहव्याधी असणाऱ्या व्यक्ती आणि वृद्ध यांनी जाणे टाळावे. शिंकताना किंवा खोकलतांना नाक आणि तोंड झाकण्यासाठी रुमाल, टिश्यू पेपरचा वापर करावा. हाताची स्वच्छता राखणे, वारंवार हात धुणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे टाळणे तसेच कोविड लक्षणे आढळल्यास तत्काळ कोविड चाचणी करणे आवश्यक आहे.

# संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी सर्वांची : खा.पटेल

**पवनी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्व धर्माचा अभ्यास करुन बुद्ध धम्माचा स्विकार केला. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय यावर आधारित देशाला बुद्ध विचारांचे जगातील सर्वश्रेष्ठ संविधान दिले. अशा संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपली सर्वांची असल्याचे सांगून बुद्ध मूतीच्या अनावरण प्रसंगी उपस्थित राहण्याचे भाग्य मला मिळाले, असे प्रतिपादन खासदार प्रफुल्ल पटेल यांनी केले.



पवनी येथील चंद्रमणी बौद्ध विहार परिसरात बाल समुद्र तलावाचे काठावर ५७ फुट उंच बुद्ध मूतीचे अनावरण भदंत आर्य नागार्जुन सुरई ससाई यांचे हस्ते करण्यात आले. याप्रसंगी राज्यसभा सदस्य प्रफुल्ल पटेल कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून उपस्थित होते. खा. पटेल पुढे म्हणाले, ही मूती राज्यात पवनी या नगरीचा मान उंचविणारी आहे. या परिसराच्या विकासासाठी आपण सदैव प्रयत्नशील असल्याचे आयोजकांना आश्वस्त केले.

यावेळी प्रमुख अतिथी म्हणून माजी मंत्री नितीन राऊत, माजी खासदार जोगेंद्र कवाडे, आमदार राजू कारेमोरे, आमदार मनोहर चंद्रीकापूरे, माजी खासदार मधुकर कुकडे, समाज कल्याण आयुक्त प्रशांत नारनवरे, लिडकॉमचे मॅनेजींग डायरेक्टर धम्मज्योती गजभिये, जि.प.सदस्य मोहन पंचभाई, माजी नगराध्यक्ष मोहन सुरकर, प्रकाश पचारे, डी.एफ.कोचे , महेंद्र गडकरी, अशित बागडे उपस्थित होते.माजी मंत्री नितीन राऊत यांनी संविधानाचे रक्षण करण्याची जबाबदारी आपली आहे. संविधानाला हात लावाल तर याद राखा, असा गर्भित इशारा दिला. प्रास्ताविक विकास राऊत, संचालन विवेक गायधने, शैलेश मयुर तर आभार प्रदर्शन ब्रह्मदास बागडे यांनी केले. कार्यक्रमासाठी डॉ. सुनील जिवनतारे, प्राचार्य नामदेव मेर्शाम, डॉ. सागर लोखंडे, रमेश लोणारे, भक्तराज गजभिये व बौद्ध विहार समितीचे पदाधिकारी यांनी पर्शिम घेतले.

# समता पर्व निमित्ताने विशेष जाती दावा पडताळणी अभियान

**गोंदिया :** जिल्ह्यात १ एप्रिल ते ३० एप्रिल २०२३ अंतर्गत समता पर्व अभियान राबविण्यात येत असून या निमित्ताने जिल्हा जात पडताळणी समितीतर्फे विशेष अभियान राबविले जात आहे. सन २०२२–२३ या सत्रात शैक्षणिक (१२ वी विज्ञान) व शैक्षणिक सत्र सन २०२३–२०२४ (११ वी विज्ञान शाखा) ज्या मागासवर्गीय प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी (अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र) प्रवर्गातून जाती दावा पडताळणीचे प्रकरण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया येथे अर्ज सादर केले नाहीत त्यांनी तात्काळ कार्यालयात अर्ज सादर करावे, असे आवाहन उपायुक्त तथा सदस्य जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती राजेश पांडे यांनी केले आहे.

सन २०२३–२४ या शैक्षणिक सत्रात ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांनी आरक्षित (अनु. जाती, विजाभज, इमाव व विमाप्र) प्रवर्गातून पुढील व्यावसायिक शिक्षणाकरीता बी.ई., वैद्यकीय पदवी, बी.एड, एम.एड., बि.पी.एड., एम.एड., एल.एल.बी., एम.बी.ए. पदवी अभ्यासक्रमाला सीईटी व कॅप अंतर्गत प्रवेशाकरीता अर्ज सादर केले असेल अशा विद्यार्थ्यांनी जाती दावा पडताळणीचे प्रकरण जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, गोंदिया येथे सादर करावे.

सन २०२२–२०२३ या शैक्षणिक सत्रात ज्या विद्यार्थ्यांना अद्याप पर्यंत वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही तसेच ज्या अर्जदारांचे प्रकरणात त्रुटी आढळून आलेल्या आहेत. अशा विद्यार्थ्यांना त्यांचे प्रकरणातील त्रूटी विद्यार्थी तसेच अर्जदारांचे ई–मेलवर कळविण्यात आलेल्या आहेत. तथापी, अद्यापही ज्या विद्यार्थ्यांनी त्यांचे जाती दावा पडताळणी प्रकरणात त्रुटी पुर्तता केलेली नाही तसेच ज्या विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र ई–मेलव्दारे प्राप्त झालेले नाही, त्या विद्यार्थ्यांनी किंवा त्यांच्या पालकांनी जाती दावा पडताळणी प्रकरणातील त्रुटी संदर्भात आवश्यक पुरावे व कागदपत्रे त्यांचे जात प्रमाणपत्र पडताळणी आयडीवर मुळ स्वरुपात अपलोड करुन समितीकडे सादर करावे.

समान संधी केंद्राच्या माध्यमातुन महाविद्यालयातील ११ वी १२ वी विज्ञान शाखेतील सर्व मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे अर्ज समितीस पडताळणीकरीता प्राप्त होतील यादृष्टीने संबंधित नोडल अधिकारी यांनी कार्यवाही करण्याचे तसेच त्यांनी महाविद्यालयीन स्तरावर इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना संगणक, इंटरनेट सुविधा, प्रिंटर व सुयोग्य मनुष्यबळ उपलब्ध करुन द्यावे असे आवाहनही राजेश पांडे यांनी केले आहे.

# गोपलानी यांची अनधिकृत ३०० एकर जमीन शासनजमा होणार का?

## दोन वर्षापासून प्रशासनाची टाळाटाळ: माजी एसडीओंची लोकायुक्तांकडे तक्रार, उच्च न्यायालयात जाण्याचे निर्देश

**गोंदिया:** जिल्ह्यात २६ एकरपेक्षा अधिक जमीन ठेवण्याचा अधिकार नसताना शेकडो हेक्टर जमीन बाळगणाऱ्या देविदास पोहुमल गोपलानी यांची अंदाजे ३०० एकर जमीन सन २०१९ मध्ये सिलींग कायद्यांतर्गत शासन जमा केली होती. परंतु या आदेशाविरोधात उदय गोपलानी व इतरांनी महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण नागपूर यांच्याकडे कायद्याचे कलम ३६ अंतर्गत अपील दाखल केले. त्यामुळे महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने एसडीओ यांनी दिलेल्या आदेशाची फेरचौकशी न करताच तो आदेश रद्द केला. या आदेशावर शासनाने उच्च न्यायालयात आव्हान देणे अपेक्षित होते. परंतु २ वर्षाचा कालावधी लोटूनही या प्रकरणात उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल न केल्याने कार्यवाही करण्याची तक्रार तत्कालीन एसडीओ अनंत वालस्कर यांनी लोकायुक्तांकडे केली आहे. गोंदिया शहराच्या लगतच्या गावांमध्ये देविदास पोहुमल गोपलानी यांनी मोठ्या प्रमणात जमिनी खरेदी करुन अनाधिकृत भुखंड विक्री केल्याचा आरोप आहे. याबाबत गोंदिया येथील प्रकाश रामदेव जायस्वाल यांनी देविदास पोहुमल गोपलानी यांनी खरेदी केलेल्या शेतजमिनीची माहिती गोळा करुन महाराष्ट्र शेतजमीन धारणेची कमाल मर्यादा अधिनियम १९६१ या कायद्याचे भंग झाल्याची तक्रार एसडीओ गोंदियाकडे केली होती. त्या अनुषंगाने तत्कालीन उपविभागीय अधिकारी गोंदिया यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी यांची मान्यता घेऊन दिनांक ७ सप्टेंबर २०१९ रोजी देविदास गोपलानी यांनी सिलींग कायद्यानुसार कमाल जमीन धारणापेक्षा जास्तीची अंदाजे ३०० एकर जमीन शासन जमा केली होती.

### गोंदियातील व्यक्ती ३६ एकर ठेवू शकतो शेती

**सिलींग कायद्याचा उद्देश आर्थिक यंत्रणा राबविताना परिणामी धनदौलतीचा व उत्पादन साधनांचा जनसामान्यात अपायकारक होईल अशाप्रकारे एकाच ठिकाणी संचय होऊ नये या उद्देशाने सिलींग कायद्याने जमीन धारणेची कमाल मर्यादा गोंदिया जिल्ह्याकरिता १४,५६.६८ हेक्टर आर (३६ एकर) कोरडवाहू शेतजमीन निर्धारित केली आहे. हे धारण क्षेत्र प्रारंभीची तारीख २ ऑक्टोबर १९७५ पासून लागू केले आहे. व कायद्याचे कलम ९ नुसार कुठल्याही कुटुंब घटकाला २ ऑक्टोबर १९७५ नंतर निर्धारित केलेल्या जमिनीपेक्षा जास्त जमीन धारण करता येत नाही. ही तरतूद असताना शासनाने दुर्लक्ष केल्यामुळे कोट्यावधी रुपये किमतीची जमीन गैरकायदेशीररित्या गोपलानी कुटुंबाला बहाल झालेली आहे.**

### कर्तव्यात कसूर करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई करा

**सिलींग कायद्याचे कलम ४५ नुसार आयुक्त जिल्हाधिकारी हे नियंत्रण अधिकारी आहेत व अतिरिक्त जिल्हाधिकारी गोंदिया यंनी प्रकरण सुरु करण्यास परवानगी दिल्यामुळे उपविभागीय अधिकारी अनंत वालस्कर यांनी आदेश पारीत केला होता. त्या आदेशाी व महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांनी पारित केलेल्या आदेशाची छाननी करणे आवश्यक होते. महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण यांच्या आदेशाविरुद्ध उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल करण्याची कायदेशीर जवाबदारी होती. म्हणून आयुक्त नागपूर, जिल्हाधिकारी गोंदिया व अतिरिक्त जिल्हाधिकारी गोंदिया यांनी कर्तव्यात कसूर केल्याबद्दल त्यांच्या विरोधात देखील शिस्तभंगाची कारवाई करण्याची मागणी अनंत वालस्कर यांनी केली आहे.**

# ओबीसीच्या हक्काच्या लढाईत युवकांनी सहभाग घ्यावा-उमेश कोरराम




**नागपूर:** येथे ओबीसी युवा अधिकार मंचतर्फे राष्ट्रपिता महात्मा ज्योतिबा फुले आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संयुक्त जयंती साजरी करण्यात आली. सोबतच ओबीसी युवा अधिकार मंचचे प्रथम वर्धापन दिवस साजरा करण्यात आला. मागच्यावर्षी १४ एप्रिल २०२२ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचे औचित्य साधून ओबीसी युवकांनी मिळून ओबीसी युवा अधिकार मंचची स्थापना केली होती.

ओबीसी युवा अधिकार मंचच्या माध्यमातून वर्षभर अनेक कार्यक्रम व मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. त्यात प्रामुख्याने १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२२ पर्यंत विदर्भातील ७ जिल्ह्यात मंडल यात्रा काढण्यात आली होती. त्यात प्रामुख्याने ओबीसी जनगणना,ओबीसींचे वसतिगृह, विदेश शिष्यवृत्ती, स्वाधार योजना, इतर मागास आर्थिक विकास महामंडळ, वसंतराव नाईक आर्थिक विकास महामंडळ, मागासवर्ग आयोग, सावित्रीबाई फुले मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती, ओबीसींना १००% शिष्यवृत्ती तथा महाज्योती बद्दल माहिती देण्यात आली व अनेक महाविद्यालयात जाऊन मार्गदर्शन केले गेले. सोबतच अनेकदा विद्यार्थी युवकांच्या हक्कांसाठी मंच नेहमी अग्रेसर राहिला. शासनाने ७२ वसतिगृह, स्वाधार योजना आणि विदेश शिष्यवृत्ती योजना काही प्रमाणात मान्य केली आहे आणि बरेच मुद्दे प्रलंबित आहेत अजूनही ७२ वसतिगृह व स्वाधार योजना सुरू झालेली नाही.

यावर्षी सुद्धा मोठ्या उत्साहाने आणि जोमाने मंडल यात्रा काढण्याचे ओबीसी युवा अधिकार मंचने ठरविले आहे. यावर्षी ओबीसी जनगणनेचा मुद्दा महत्त्वाचा असेल यासाठी लोकांमध्ये जाऊन जनजागृती करण्यात येणार आहे.

आजच्या कार्यक्रमात महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याविषयी माहिती सांगण्यात आली आणि मंडल यात्रा व इतर कार्यक्रमासंबंधी चर्चा करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उमेश कोरराम होते. या ओबीसींच्या न्याय व हक्काच्या लढाईत युवकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन उमेश कोरराम यांनी केले. पियुष आकरे,राहुल वाढई, देंवेंद्र समर्थ,अनुप खडक्कर, पंकज सावरबांधे, नितीन पडोळे,रजत लांजेवार, धिरज भिषिकर,मनीष गिरडकर शैलेश निरंजने कार्यक्रमात उपस्थित होते. राहुल वाढई यांनी आभार प्रदर्शन केले.

# पोलिसांनी जप्त केलेले वाहन झाले भंगार



**गोंदिया:–** अनेक गुन्ह्यात वापरलेली, अपघातग्रस्त वाहने पोलिसांकडून जप्त केले जातात, अशी हजारो वाहने पोलिस ठाण्याच्या आवारात पडून आहेत. या वाहनांचे स्पेअरपार्ट चोरीस जातात, चांगली सुस्थितीतील वाहने अनेक वर्षांच्या दुर्लक्षामुळे आता भंगारात विकण्याच्या अवस्थेत आली आहे. वाहनांची निर्गती होत नसल्याने पोलिस ठाणे परिसरात वाहन ठेवण्यासाठी जागाच नाही. जिल्ह्यात दारुची अवैधरित्या वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई करुन त्यांची वाहने जप्त केली जातात. अनेकदा वाहनांची कागदपत्रे नसल्याने ते वाहन सोडवू शकत नाहीत. पोलिस ठाण्यांत अशा वाहनांची संख्या सर्वाधिक आहे.

गोंदिया जिल्ह्यातील अनेक पोलिस ठाण्यात अशा भंगार वाहनांची रांग दिसते. पोलिसांना कारवाईत सापडलेली वाहने जागेवर सडत आहेत, अशा वाहनांमधील काही स्पेअर पार्ट काढून घेतले जातात. अशा तक्रारीही असतात. मात्र, वाहनांची स्थितीच इतकी भंगार झालेली असते, की या पार्टचा वापर होण्याची शक्यता कमीच असते.

सध्या तरी अशी वाहने धूळखात आहेत. पोलिस ठाण्यांमध्ये चोरीचा मुद्देमाल, इतर गुन्ह्यातील वाहने अनेक वर्षांपासून बेवारस पडून आहे. अशा वाहनांचा आता हिशोबही लागने कठीण झाले आहे. ज्यांनी आपली वाहने न्यायालयातून सुपूर्तनाम्यावर सोडविलेली नाही, अशी वाहने जमा केली जातात. त्यानंतर वाहनांचा लिलाव करण्यासाठी न्यायालयातून परवालनगी मागितली जाते. न्यायालयाने परवानगी दिल्यावर ही वाहने स्क्रॅपसाठी भंगारात विकली जातात.

# ओबीसी कष्टकरी संस्कृतीचा मोठा इतिहास–श्रावण देवरे

**राजुरा:–** ओबीसीबद्दल देशात अनेक गैरसमज जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आले आहेत. वास्तविक विद्वत्ता आणि कष्टाला सन्मान देणारे लढवय्ये ओबीसी असून बहुतांश राजकीय पक्षांनी संकुचित राजकारण करीत त्यांचे खच्चीकरण करण्यात धन्यता मानली. महात्मा फुले या ओबीसीच्या खऱ्या नेत्याने मार्ग दाखविला. मात्र, त्यांचे प्रगल्भ विचार संकुचित करण्यात आले. आता ओबीसींचा र्शमाला सन्मान देणाऱ्या संस्कृतीचा जाज्वल्य इतिहासावर दृष्टिक्षेप टाकत स्वत:ची राजकीय व्यवस्था उदयास आणल्यास ओबीसींचे भवितव्य देदीप्यमान होईल, असे प्रतिपादन नाशिक येथील साहित्यिक व ज्येष्ठ ओबीसी नेते श्रावण देवरे यांनी केले.




राजुरा येथील जगतगुरू तुकोबाराया सार्वजनिक वाचनालय येथे आयोजित महात्मा फुले आणि डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित संयुक्त कार्यक्रमात श्रावण देवरे बोलत होते. अध्यक्षस्थानी दत्तात्रेय मोरे होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन किरण ढुमणे यांनी केले. प्रमुख अतिथी गोरक्षनाथ आखाडे, शोभा देवरे, लक्ष्मण घुगुल, विजय मोरे, नंदकिशोर वाढई, ज्ञानेश्वर शिरसाट इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी किरण ढुमणे म्हणाले की, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी मोठा वैचारिक वारसा दिलेला असताना आपण त्यांचे विचार सर्व ओबीसीपर्यंत पोहोचवून त्यांना सर्मथ करून सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय परिवर्तन घडवून आणू शकतो. प्रास्ताविक दिनेश पारखी, संचालन मधुकर डांगे व आभार संभाजी साळवे यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी जगदीश पिंगे, दिलीप गिरसावळे, लक्ष्मण तुराणकर, सुधीर झाडे, विनोद बोबडे, मधुकर मटाले, राकेश देवाळकर, बाबुराव झटाले, बाबुराव मुसळे, अँड. मारोती कुरवटकर, पुंडलिक वाढई, अमोल राऊत, प्रणीत झाडे, धर्मू नगराळे यांनी सहकार्य केले.